दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ७ वे अंक –३३ | रविवार दि.११ ऑक्टोबर २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-7th Issue- 33 Sunday, Dt.11 October 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# आंदोलनाचा वणवा... काँग्रेसने आमदार, खासदारांना दिल्लीत बोलवलं; सरकारविरुद्ध मोठं आंदोलन उभारण्याची तयारी

नागपूर : दिल्लीत आणि मुंबईतही आजचा दिवस गाजला तो एसआयआर आणि मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी करत सुरू असलेल्या आंदोलनाने. कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपकेंनी आज दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलनाची घोषणा केली होती. त्यासाठी, अभिजीत दिपकेंसह त्यांचे साथीदार विमानाने दिल्लीत पोहोचले. मात्र, विमानतळावरच महिला पोलिसांनी अभिजीत दिपकेंना ताब्यात घेतलं. त्यामुळे, आंदोलनाची धुरा अजिंक्य शिंदे यांच्याकडे आली. मात्र, या घटनेनंतर विरोधी पक्षातील नेते आक्रमक झाले आहेत. दिल्ली पोलिसांनी काही नेत्यांनाही ताब्यात घेतलं. त्यानंतर, आता काँग्रेसने दिल्लीत मोठं आंदोलन उभारण्याची तयारी सुरू केली आहे.

काँग्रेसकडून राज्यात आणि दिल्लीत सरकारच्या विरोधात मोठे आंदोलन उभे करण्याची तयारी सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर देशातील काँग्रेसच्या सर्व आमदार, खासदार आणि वरिष्ठ नेत्यांना दिल्लीत उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. उद्या संध्याकाळपर्यंत सर्वच आमदार-खासदारांनी दिल्लीमध्ये उपस्थित राहावे, असे निर्देशच पक्षनेतृत्वाने दिले आहेत. विशेष म्हणजे, केवळ महाराष्ट्रच नाही, तर सर्व राज्यांच्या प्रदेशाध्यक्षांनाही दिल्लीत उपस्थित राहण्यासाठी सांगण्यात आलं आहे. त्यामुळे, पुढील काळात काँग्रेसह इंडिया आघाडीचं सरकारविरोधात मोठं आंदोलन उभं राहण्याची शक्यता आहे.

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी मुंबईतील ऑगस्ट क्रांती मैदानावर आज सीजेपीने आंदोलनाची हाक दिली होती. येथे आंदोलक जमा होण्यास सुरुवात होताच पोलिसांनी धरपकड सुरू केली. पोलिसांनी मुंबईतील अनेक भागात विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं. विशेष म्हणजे, सीजेपीच्या आंदोलनासाठी जात असलेल्या महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांना देखील पोलिसांनी अंधेरी पश्चिमेकडील डी.एन नगर पोलीस ठाण्यामध्ये डिटेन केले होते. त्यानंतर, डी.एन. नगरपोलीस ठाण्याबाहेर मोठ्या प्रमाणावर शिवसेना आणि काँग्रेस कार्यकर्ते गोळा झाले. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला आहे. तर, खासदार संजय राऊत आणि आमदार आदित्य ठाकरे हेही डीएन नगर पोलीस ठाण्यात पोहोचले होते. जोपर्यंत तुषार गांधी यांची सुटका होत नाही, तोपर्यंत पोलीस स्टेशन सोडणार नाही, असा इशारा आदित्य यांनी दिला होता.






**नागपूर, नाशिकमध्येही आंदोलक रस्त्यावर**

नाशिकमध्ये ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले, विविध संघटना आणि राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आंदोलनात सहभागी होते. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात होता, आंदोलन करणाऱ्या काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यातही घेतले. शहरातील अशोक स्तंभ, महात्मा गांधी रोड ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत मोर्चा काढण्यात आला. दुसरीकडे नागपूरमध्येही ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलक रस्त्यावर उतरल्याचं दिसून आलं.

## केजमध्ये ड्रग्ज पुरवणारा रेवण नखाते जेरबंद




**कळंब पोलिसांची धडक कारवाई, तपासात बड्या नावांचा पर्दाफाश होण्याची शक्यता !**

केज/प्रतिनिधी

केज तालुक्याच्या शेजारीच असलेल्या कळंब शहरातील बहुचर्चित एमडी ड्रग्ज तस्करी प्रकरणात कळंब पोलिसांना मोठे यश मिळाले असून,या रॅकेटचे थेट केज कनेक्शन समोर आले आहे.या आंतरजिल्हा सिंडिकेट मधील आठवा संशयित आरोपी रेवण सोपान नखाते रा.केज याला कळंब पोलिसांनी शुक्रवारी दि.९ रोजी रात्री क्रांती नगर भागातून बेड्या ठोकून जेरबंद केले आहे. रेवण नखाते याच्या अटकेमुळे केज शहरात आणि परिसरात एकच खळबळ उडाली असून,त्याचे पेडलर्स केज मध्ये नेमके कोणा कोणाला ड्रग्ज

पान २ वर...

## केंद्रीय पथकाने दोन दिवसांपूर्वी बीड जिल्हा कृषी विभागाने बसवलेल्या स्वयंचलित हवामान यंत्रणेची पाहणी केली आता अभिलेखांची पडताळणी करणार का..?



**बीड जिल्ह्यातील स्वयंचलित हवामान केंद्रांचा प्रत्यक्ष इतिहास आणि वर्तमान कार्यस्थितीही तपासणे गरजेचे..!**

**दोन दिवसांपूर्वी मशिनरी सहित बसवलेली वायरिंग नवीन असल्याचे कोणीही सांगेल. याला कोणी तज्ञ आणण्याची गरज नाही.? नटबोल्ट सुद्धा नवीन करकरीत आहेत. जर असा प्रकार असेल तर बीड जिल्ह्यातील हवामानाचा खरा अंदाज प्रशासनापर्यंत कसा समजणार..? शेतकऱ्यांना न्याय कसा मिळणार.? हा सर्व दोष बीडच्या जिल्हा कृषी विभागाचा आहे..**

बीड ।प्रतिनिधी

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव तथा पथकप्रमुख मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील पथकाने पाली येथील हवामान केंद्राची पाहणी केली. तापमान, हवेतील आर्द्रता, वाऱ्याचा वेग व दिशा आणि पर्जन्यमान नोंदविणाऱ्या यंत्रणेची माहिती पथकाने घेतली. या केंद्रातून दर दहा मिनिटांनी हवामानविषयक माहिती संकलित केली जाते, असे सांगण्यात आले. मात्र जुन्या पोलच्या सांगाड्यावर केंद्रीय पथक येणार असल्याने दोन दिवसापूर्वी बीड जिल्हा कृषी विभागाने स्वयंचलित हवामान

पान २ वर...

# भरपाई दिवाळीपूर्वी देण्यासाठी पीक पाहणी वेळेत पूर्ण करा – अग्रवाल

**पावसाच्या खंडामुळे ७.४२ लाख हेक्टरवरील पिके बाधित,धरणांतील उपयुक्त पाणीसाठा १४.६१ टक्क्यांवर, चारा ४७ दिवस पुरेल इतकाच..!!**







बीड (जिमाका)

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पीक नुकसानीपोटी भरपाई दिवाळीपूर्वी मिळावी, यासाठी पीक कापणी प्रयोग वेळेत पूर्ण करून नुकसानीची अचूक नोंद घ्यावी. सोयाबीनचे प्रलंबित पीक कापणी प्रयोग दिवाळीपूर्वी पूर्ण करावेत. दुष्काळाची तीव्रता निश्चित करण्यासाठी प्रत्यक्ष परिस्थिती आणि तांत्रिक आकडेवारीची पडताळणी करावी. पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि रोजगार उपलब्धतेचे प्रभावी नियोजन करावे, अशा सूचना केंद्रीय पथकाचे प्रमुख तथा केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांनी दिल्या.

दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आलेल्या केंद्र शासनाच्या आंतरमंत्रालयीन पथकाने बीड जिल्हाधिकारी कार्यालयात पीकस्थिती, पाणीटंचाई, भूजल पातळी, चारा उपलब्धता आणि शेतकरी मदत वितरणाचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यातील परिस्थितीचे सादरीकरण केले. बैठकीला राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग, महालनोबिस राष्ट्रीय पीक पूर्वानुमान केंद्राचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, कृषी सहसंचालक सुनिल वानखेडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे व पाटबंधारे विभाग अधीक्षक अभियंता पल्लवी जगताप यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### रोजगार हमीच्या कामांतून जलसंधारणाला प्राधान्य..

दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागातील रोजगाराची गरज लक्षात घेऊन रोजगार हमी योजनेंतर्गत अधिकाधिक कामे उपलब्ध करून द्यावीत. जलसंधारण, पाणी साठवणूक आणि पाण्याची उपलब्धता वाढविणाऱ्या कामांना प्राधान्य द्यावे, अशा सूचना देण्यात आल्या.

२०२६–२७ या आर्थिक वर्षात जून ते ऑक्टोबरदरम्यान १ लाख १८ हजार ७२२ कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला असून, १९ लाख ३ हजार ५१२ मनुष्यदिनांची निर्मिती झाली आहे. मागील वर्षी याच कालावधीत ३ लाख ४८ हजार ५५४ कुटुंबांना रोजगार मिळाला होता. पात्र मजुरांना वेळेत मजुरी मिळावी, यासाठी बँक खात्यांचे आधारशी संलग्नीकरण आणि लाभार्थ्यांच्या नोंदी अचूक ठेवण्यावर भर देण्यात आला.दुष्काळी परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करण्यासाठी शेतपीक नुकसान, पर्जन्यमान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, भूजल पातळी, जनावरांसाठी चारा आणि रोजगाराच्या संधी या बाबींचा एकत्रित विचार करावा. पीक कापणी प्रयोग वेळेत पूर्ण करून आकडेवारीची प्रत्यक्ष परिस्थितीशी पडताळणी करावी आणि शेतकऱ्यांना भरपाई वेळेत मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे अग्रवाल यांनी स्पष्ट केले.

**७.४२ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान..**

जिल्ह्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ५६६.१ मिलिमीटर असून, यंदा जून ते सप्टेंबर दरम्यान ३५६ मिलिमीटर पाऊस झाला. हे प्रमाण सरासरीच्या ६२.८९ टक्के आहे. ऑगस्टमध्ये सरासरीच्या १८.४ टक्के, तर सप्टेंबरमध्ये ४१.६ टक्के पाऊस झाला. पावसातील दीर्घ खंडामुळे खरीप पिकांच्या वाढीवर आणि उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

जिल्ह्यात खरीप हंगामात ७ लाख ८७ हजार २१८ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली असून, त्यापैकी ७ लाख ४२ हजार १६३ हेक्टरवरील पिके बाधित झाली आहेत. जिल्ह्यातील १ हजार ३५३ गावांमधील सुमारे ८ लाख २२ हजार ३६० शेतकरी या नुकसानीने प्रभावित झाल्याचे अहवालात नमूद आहे.

सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका आणि बाजरी या पिकांवर पावसाच्या खंडाचा परिणाम झाला आहे. काही भागांत सोयाबीनच्या शेंगांचा अपुरा विकास, दाण्यांचा लहान आकार, कापसात फुलगळ आणि वाढ खुंटण्याची समस्या दिसून आली. तूर, मूग व उडदाच्या शेंगा धरण्यावरही परिणाम झाला आहे.

### दुष्काळाचे मूल्यांकन तांत्रिक निकषांवर..

दुष्काळाची तीव्रता निश्चित करण्यासाठी पिकांची स्थिती, पेरणी क्षेत्र, मातीतील ओलावा, पाण्याची उपलब्धता, वनस्पती स्थिती निर्देशांक आणि जलसाठा निर्देशांक या बाबींचा आढावा घेण्यात आला.जिल्ह्यातील अकराही तालुक्यांमध्ये पावसाच्या खंडाचे वेगवेगळे परिणाम दिसून येत आहेत. वनस्पती स्थिती निर्देशांकानुसार बहुतांश तालुक्यांतील परिस्थिती गंभीर श्रेणीत नोंदविण्यात आली. मातीतील ओलाव्याच्या पर्याप्तता निर्देशांकानुसार आष्टी, धारूर, गेवराई, केज आणि शिरूर कासार तालुक्यांमध्ये गंभीर स्थिती आढळली.

**सोयाबीनचे उत्पादन हेक्टरी १,५३४ किलोवरून ४१० किलो..**

पीक कापणी प्रयोगांच्या प्राथमिक आकडेवारीनुसार, सोयाबीनचे मागील पाच वर्षांतील सरासरी उत्पादन हेक्टरी १ हजार ५३४.२ किलो होते. यंदाच्या हंगामातील उपलब्ध प्रयोगांनुसार हे उत्पादन हेक्टरी ४१० किलो नोंदविण्यात आले आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादनात मोठी घट झाल्याचे दिसून येते.

८ ऑक्टोबरपर्यंत जिल्ह्यातील पीक कापणी प्रयोगांचे ३ हजार १३२ उद्दिष्ट असताना ९५७ प्रयोग पूर्ण झाले होते. सोयाबीनच्या ५७६ नियोजित प्रयोगांपैकी ३१० प्रयोग पूर्ण झाले. याशिवाय बाजरीचे १७४, मूगाचे ३११, उडदाचे १२२ आणि मक्याचे २९ प्रयोग पूर्ण झाले होते. कापूस व तूर पिकांचे प्रयोग प्रलंबित होते.

पीक कापणी प्रयोग वेळेत पूर्ण करून त्यांचे योग्य पर्यवेक्षण करावे. शेतकऱ्यांचा सहभाग वाढवावा आणि नोंदविलेल्या उत्पादनाची प्रत्यक्ष परिस्थितीशी पडताळणी करावी, अशा सूचना अग्रवाल यांनी दिल्या.

दुष्काळ निश्चितीच्या ट्रिगर-१ व ट्रिगर-२ निकषांसह राष्ट्रीय कृषी दुष्काळ व्यवस्थापन केंद्राच्या माहितीचा विचार करावा. तालुकानिहाय माहिती तक्त्यांच्या स्वरूपात सादर करून प्रत्यक्ष पाहणी, पर्जन्यमान आणि तांत्रिक निर्देशकांच्या आधारे वस्तुनिष्ठ अहवाल तयार करावा, असे अग्रवाल यांनी सांगितले.

**धरणांतील उपयुक्त पाणीसाठा केवळ १४.६१ टक्के..**

पान २ वर...

संपादकीय....

# 'स्टॉकहोम सिंड्रोम'ग्रस्त समाज

समाजाला 'स्टॉकहोम सिंड्रोम'मधून बाहेर काढले पाहिजे, अन्यथा यातून देशाचे, जनतेचे जे नुकसान होणार आहे त्याबद्दल आपल्या पुढील पिढ्या आपल्याला कधीही माफ करणार नाहीत.

'स्टॉकहोम सिंड्रोम' ही एक अशी मानसिक स्थिती आहे, जेव्हा ओलीस ठेवली गेलेली, छळलेली व्यक्ती तिच्या अपहरणकर्त्या व्यक्तीबद्दल विश्वास, निष्ठा किंवा आपुलकी विकसित करते. १९७३ साली स्टॉकहोम शहरातील एका बँकेवर पडलेल्या दरोड्याच्या वेळी दरोडेखोरांनी ज्या चार बँक कर्मचाऱ्यांना सहा दिवस ओलीस ठेवले होते त्यांच्या बदललेल्या मानसिक स्थितीचा अभ्यास करून 'स्टॉकहोम सिंड्रोम' ही संकल्पना स्वीडिश मानसोपचार तज्ज्ञ आणि गुन्हेशास्त्रज्ञ निल्स बेजेरोट (छळश्री इशक्षर्शीां) यांनी मांडली. या बदलाच्या परिणामी, दरोडा-नाट्य संपल्यावर ओलीस ठेवलेल्या बँक कर्मचाऱ्यांनी दरोडेखोरांविरुद्ध साक्ष देण्यास चक्क नकार दिला. एवढेच नाही, तर एका कर्मचाऱ्याने दरोडेखोरांची बाजू न्यायालयात मांडता यावी यासाठी निधी देखील उभारला होता. अपहरण प्रकरणातील काही अपहृत व्यक्ती 'स्टॉकहोम सिंड्रोम'ग्रस्त होऊ शकतात. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये भारतातील विशाल जनसमुदाय 'स्टॉकहोम सिंड्रोम'ग्रस्त झालाय की काय अशी शंका येते. यावर एक दृष्टिक्षेप टाकणे उद्बोधक ठरेल.

'स्टॉकहोम सिंड्रोम' अजून ठळकपणे समजून घेण्यासाठी जगभर गाजलेल्या 'मनी हाइस्ट' या बँक दरोड्याचे कथानक असलेल्या मालिकेतील मोनिका या ओलीस ठेवलेल्या बँक कर्मचारी पात्राचे उदाहरण योग्य ठरेल. तिच्याबाबत सहानुभूती दर्शविणाऱ्या डेन्व्हर नावाच्या एका दरोडेखोराच्या प्रेमात ती एवढी पडते की पुढे त्या टोळीत सामील होऊन 'स्टॉकहोम' हे नाव धारण करते. कोणत्याही अपहरणकांडात ओलीस ठेवलेल्या लोकांवर अपहरणकर्त्यांची प्रचंड दहशत असते. त्यांनी ओलिसांना खायला-प्यायला दिले, थोडीशी सहानुभूती दाखवली तरी ओलिसांना ती कृती दयाळूपणाची वाटते. ओलिसांना वाटू लागते की आता हेच आपले तारणहार आहेत. मग, अपहरणकर्त्यांची बाजू अयोग्य, बेकायदेशीर असली तरी ओलीस ठेवलेल्यांना ती न्याय्य वाटू लागते. त्यांच्या तावडीतून सुटून पळून जायची संधी मिळाली तरी ते पळून जात नाहीत. तसेच त्यांच्या तावडीतून सोडवणाऱ्या सुरक्षा यंत्रणा त्यांना शत्रू वाटू लागतात. त्यांना असे वाटणे हे त्यांच्या 'स्टॉकहोम सिंड्रोम'ग्रस्त होण्याचे लक्षण असते. मग अपहरणकर्त्यांनी केलेली गुन्हेगारी कृत्ये सुद्धा त्यांना न्याय्य वाटू लागतात.

भारतीय समाजातील काही कुटुंबांमध्ये या 'स्टॉकहोम सिंड्रोम'ची अनेक उदाहरणे आढळून येतात. आपल्या पतीने केलेला भयानक कौटुंबिक हिंसाचार सहन करून पत्नी 'भला है, बुरा है, जैसा भी है...' या भावनेने त्या पतीची सेवा करत आपले आयुष्य रेटत राहते.

पान १ वरून..

**केंद्रीय पथकाने दोन दिवसांपूर्वी....**

यंत्रणा कार्यान्वित केली. वास्तविक या यंत्रणेवर कागदोपत्री बीड जिल्ह्यात उभारणी केल्याचे दाखवून लाखो करोडो रुपयांचा चुराडा अधिकाऱ्यांनी संगनमताने केलेला आहे. याची चौकशी होऊन दोषीविरुद्ध कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. केंद्रीय पथकाने याची देखील दखल घेऊन या संदर्भात केंद्र सरकारला स्वतंत्र अहवाल देणे गरजेचे आहे. तरच अशा अधिकाऱ्यांमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांचे होणारे नुकसान भविष्यात टळेल.

यावेळी राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग आणि जिल्हाधिकारी डॉ. विवेक जॉन्सन उपस्थित होते. कहर म्हणजे बीड जिल्ह्यातील ७९ महसूल मंडळांमध्ये अशा प्रकारची स्वयंचलित हवामान केंद्रे कार्यरत असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी दिली. ही माहिती खरी किती आणि बनवा बनवी किती हे यानिमित्ताने समोर येणे गरजेचे आहे.

केंद्रीय पथकाने कागदोपत्री नोंदींवर नव्हे, तर प्रत्यक्ष तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पडताळणी करणे आवश्यक आहे. सर्व केंद्रांची स्थापना कधी झाली, त्यांना किती निधी मंजूर झाला, किती खर्च झाला, यंत्रसामग्री कधी बसवली आणि प्रत्येक केंद्रातून नियमितपणे माहिती पाठवली जात होती का, याची तपासणी झाली पाहिजे.

शेतकरी दुष्काळाने होरपळतोय, यंत्रणा मात्र तपासणीच्या फेऱ्यात.!

एकीकडे पावसाअभावी खरीप पिकांचे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. दुसरीकडे ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याची समस्या गंभीर बनली आहे. केंद्रीय पथकासमोर उपस्थित शेतकऱ्यांनी या अडचणी मांडून तातडीने मदत करण्याची मागणी केली.अशा परिस्थितीत हवामान केंद्रांमधून मिळणारी अचूक आणि वेळेवरची माहिती अत्यंत महत्त्वाची ठरते. पर्जन्यमानाच्या नोंदी, पावसातील खंड आणि हवामानविषयक आकडेवारी यांचा दुष्काळाच्या आढाव्यासह विविध कृषीविषयक निर्णयांसाठी उपयोग होऊ शकतो. त्यामुळे या यंत्रणेच्या कामकाजात कोणतीही अनियमितता आढळल्यास ती केवळ प्रशासकीय त्रुटी म्हणून दुर्लक्षित करता कामा नये.

केंद्र सरकारने स्वतंत्र चौकशी करावी..!

पाली येथील हवामान केंद्राच्या उभारणीबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची दखल घेऊन केंद्रीय पथकाने आपल्या अहवालात या बाबींची नोंद करावी, अशी मागणी पुढे येत आहे. जिल्ह्यातील सर्व ७९ महसूल मंडळांमधील केंद्रांची स्वतंत्र तांत्रिक तपासणी करावी. संबंधित कंत्राटदार, अधिकारी आणि जबाबदार यंत्रणेच्या भूमिकेची चौकशी करावी. निधीचा गैरवापर करून जाणीवपूर्वक चुकीची माहिती दिल्याचे पुराव्यांनिशी सिद्ध झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर बडतर्फीची कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. सार्वजनिक निधीतून उभारलेल्या यंत्रणेच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्न निर्माण झाले असतील, तर त्यांची निष्पक्ष चौकशी करणे प्रशासनाचे कर्तव्य आहे.

केंद्रीय पथकाच्या भेटीने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीचा प्रश्न ऐरणीवर आला आहेच पण त्याचबरोबर बीड जिल्ह्यातील स्वयंचलित हवामान केंद्रांचा प्रत्यक्ष इतिहास आणि वर्तमान कार्यस्थितीही तपासली जाणे आवश्यक आहे. केंद्रे आधीपासून कार्यरत होती की पाहणीच्या पार्श्वभूमीवरच ती कार्यान्वित करण्यात आली, याचे उत्तर आता कागदपत्रे, डिजिटल नोंदी आणि प्रत्यक्ष तपासणीतून मिळाले पाहिजे. केंद्रीय पथकाने निपक्षपणे या तक्रारींची दखल घेऊन चौकशी करणे अपेक्षित आहे. यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.

**केजमध्ये ड्रग्ज....**

पुरवत होते,याचा उलगडा आता पोलीस तपासात होणार असल्याने अनेक पांढरपेशांचे धाबे दणाणले आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेने ऑगस्ट महिन्यात ११.२१ ग्रॅम एमडी ड्रग्जच्या २९ पुड्यांसह मुद्देमाल जप्त करून या रॅकेटचा पर्दाफाश केला होता.आता केज च्या रेवण नखातेच्या अटकेमुळे पोलीस तपासाची दिशा केज शहराकडे वळली असून,नखाते च्या चौकशीतून केजमधील इतर पेडलर्स आणि ग्राहकांची नावे निष्पन्न होऊन आणखी मोठी कारवाई होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे.रेवण नखाते रा. केज याला कळंब न्यायालयासमोर हजर केले असता त्याला मंगळवार दिनांक १३ आक्टोबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले असल्याची माहिती कळंब चे पोलीस निरीक्षक शकील शेख यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

केज मध्ये कोणाकोणाला ड्रग्ज पुरविले.?

कळंब शहराला विळखा घालणाऱ्या एमडी ड्रग्जच्या अवैध व्यापाराची पाळेमुळे बीड,केज,परभणी आणि थेट पुण्यापर्यंत पसरल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. केजमधून रेवण नखाते याला अटक झाल्या नंतर आता स्थानिक पातळीवर ड्रग्जचे वितरण करणाऱ्यांची साखळी उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रेवण नखाते आणि त्याचे पेडलर्स केज शहरातील कोणत्या तरूणांना अथवा बड्या व्यक्तींना हा नशा पुरवत होते,या सिंडिकेटला कोणाचे आर्थिक व राजकीय पाठबळ होते,याचा शोध पोलीस घेत आहेत.कॉल डिटेल्स आणि संशयास्पद बँक खात्यांच्या तपासणी तून अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे.

आठ आरोपी गजाआड नगरसेवकाचा जामीन फेटाळला

या गुन्ह्यात यापूर्वी निखिल युवराज जाधव,अरविंद दादाराव कांबळे,लखन गायकवाड,अक्षय रिटे, नगरसेवक मोहसीन सलीम मिर्झा,सुशांत सुतार आणि सागर किसन गराडे रा. मावळ,पुणे अशा

पान १ वरून..

सात जणांना अटक करण्यात आली होती. आता केजच्या रेवण नखाते याच्या अटकेने ही संख्या आठवर पोहोचली आहे.

**भरपाई दिवाळीपूर्वी ....**

जिल्ह्यातील १६४ मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पांमध्ये ३.९५८ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा असून, तो एकूण साठवण क्षमतेच्या केवळ १४.६१ टक्के आहे. जलसाठा निर्देशांकानुसार १६३ प्रकल्पांमध्ये दीर्घकालीन सरासरीच्या तुलनेत ६० टक्क्यांपेक्षा अधिक तूट नोंदविण्यात आली आहे. त्यामुळे आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि शेतीसाठी पाण्याचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे.

सप्टेंबर २०२६ मधील नोंदीनुसार, जिल्ह्यातील भूजल पातळीत सरासरी ४.५५ मीटरने घट झाली आहे. पाणीटंचाई निवारण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा, विहिरी व विंधनविहिरींचे अधिग्रहण आणि पर्यायी जलस्रोतांचा वापर यावर भर देण्यात आला आहे.

टँकरच्या फेऱ्या, प्रत्यक्ष उपलब्धता आणि गावनिहाय मागणी यांची नियमित पडताळणी करावी. बीड शहरासाठी बिंदुसरा व माजलगाव धरणांशी संबंधित जलस्रोतांचा वापर, पाणीपुरवठा यंत्रणेची दुरुस्ती आणि ग्रामीण भागासाठी टँकर भरण्याची व्यवस्था यांसारख्या उपाययोजनांचे नियोजन करण्यात आले आहे. अंबाजोगाई शहरासाठीही पर्यायी पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे.

उपलब्ध चारा केवळ ४७ दिवस पुरणार..

जिल्ह्यातील जनावरांसाठी उपलब्ध चारा सध्याच्या गरजेनुसार सरासरी ४७ दिवस पुरेल, असा अंदाज आहे. तालुकानिहाय उपलब्धतेत मोठी तफावत असून, शिरूर कासार तालुक्यातील चारा केवळ ८ दिवस, तर गेवराई तालुक्यात १९.६ दिवस पुरेल. आष्टी तालुक्यातही चारा सुमारे २२.४ दिवस पुरण्याची स्थिती आहे.

संभाव्य चारा टंचाई लक्षात घेऊन चारा पिकांचे क्षेत्र वाढविणे, मका बियाण्यांचे वितरण आणि रब्बी हंगामातील चारा उत्पादनाचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ४९ हजार ७४० किलो मका बियाण्यांचे वितरण करण्यात आले असून, त्यातून १ हजार ९८९.६ हेक्टर क्षेत्रावर लागवड आणि ९९ हजार ४८० मेट्रिक टन हिरवा चारा उत्पादन अपेक्षित आहे.

विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पांतर्गतही मका बियाणे वितरणाचे नियोजन आहे. नदीपात्रातील ७३९ हेक्टर क्षेत्रावर चारा लागवड करून ३६ हजार ९५० मेट्रिक टन हिरवा चारा उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. चाऱ्याची मागणी, उपलब्धता आणि संभाव्य तूट यांचा तालुकानिहाय आढावा घ्यावा. जनावरांची अद्ययावत संख्या निश्चित करून आधार संलग्नीकरण व ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, अशा सूचना देण्यात आल्या.

पीक विमा व शेतकरी मदत वितरणाला गती द्या..

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०२६-२७ अंतर्गत जिल्ह्यातील ३ लाख ६६ हजार ९२ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला आहे. जिल्ह्यातील एकूण शेतकऱ्यांपैकी ४१.७९ टक्के शेतकरी विमा संरक्षणाखाली आले आहेत. विमा संरक्षित क्षेत्र ४ लाख २२ हजार २८२ हेक्टर असून, ते खरीप पेरणी क्षेत्राच्या ५३.६४ टक्के आहे.

पीक नुकसानीच्या भरपाईसाठी पात्र शेतकऱ्यांची नोंदणी, आधार संलग्नीकरण आणि ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी. कर्जदार व बिगर-कर्जदार शेतकऱ्यांच्या नोंदींची पडताळणी करून तांत्रिक अडचणी दूर कराव्यात आणि आधार-आधारित देयकांमधील अडथळे दूर करून पात्र शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळेल, यासाठी कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले.

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांसाठी २०२२ ते २०२६ या कालावधीत विविध मदत योजनांमधून जिल्ह्याला २ हजार ७८६.१७ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. त्यापैकी २ हजार ३३९ कोटी रुपये लाभार्थ्यांच्या खात्यांत जमा करण्यात आले आहेत. उर्वरित निधी वितरणातील अडचणी दूर करून पात्र लाभार्थ्यांना मदत मिळवून देण्यावर भर देण्यात आला.

दै.समर्थ राजयोग दि.११/१०/२०२६

## CHANGE IN NAME

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME
**OLD NAME:-** SALEEM ABBAS SHAIKH
**NEW NAME:-** SALIM ABBAS SHAIKH
**PRESENT ADDRESS-** BAJAR WAHEGAON TQ BADLAPUR DIST JALNA PIN CODE: 431202
MOBILE NO.: +8380897143
THIS DECLARATION IS MADE FOR ALL LEGAL PURPOSES.

**श्री.एस.एस.बडगुजर सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, केज, यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज ४४०/२०२६**
**गोदावरी व इतर विरुध्द निरंक**

ज्यापेक्षा बन्सी रामभाऊ मोरे, रा. भालगाव ता. केज जि. बीड हे दिनांक ०१/०८/२०२६ रोजी, किंवा त्या सुमारास मौजे भालगाव ता. केज. जि. बीड येथे मयत झालेले असून अर्जदार रा. भालगाव ता. केज जि. बीड यांनी हया कोर्टात सदरहू मयत बन्सी रामभाऊ मोरे, रा. भालगाव ता. केज जि. बीड.

अर्जदार :-

१. गोदावरी भ्र. बन्सी मोरे, वय ८० वर्षे, धंदा- निरंक रा. भालगाव ता. केज. जि. बीड २. प्रभावती भ्र. राजाभाऊ कदम, वय-५० वर्षे, धंदा- घरकाम रा. वांजरखेडा ता. लातूर ३. सुनिता भ्र. श्रीकिशन सोमवंशी, वय - ६१ वर्षे, धंदा- घरकाम रा. नायगाव ता. केज. जि. बीड. ४. रंजना भ्र. दादासाहेब लोंढे, वय- ४६ वर्षे, धंदा- घरकाम रा. भालगाव ता. केज. जि. बीड.

विरूध्द

गैर-अर्जदार :-निरंक

यांनी शासकीय/निमशासकीय कामासाठी वारसाचे सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज विधिज्ञ ए. व्ही. धायगुडे यांच्यामार्फत केला आहे. त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदर सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क साबित दिसल्यास त्याला सदरहू मयत बन्सी रामभाऊ मोरे, रा. भालगाव ता. केज जि. बीड, चे वारसाचे सर्टिफिकेट देईल. आज दि. ०९/१०/२०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील दि. २१/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,केज

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८३४/२०२६**
**अनुसयाबाई भ्र. सुदाम तुपे व इतर वि. निरंक**
**मार्फत ॲड बी. व्ही. ठोसर, गेवराई)**

अर्जदार

१. अनुसयाबाई भ्र. सुदाम तुपे वय ६५ वर्षे, धंदा - शेती
रा. आगर नांदूर ता. गेवराई जि. बीड
२. बप्पा पि. सुदाम तुपे वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. सदर
३. मिराबाई भ्र. कडूदास काकडे
वय ४५ वर्षे, रा. माळहिवरा ता. गेवराई जि. बीड
४. शारदाबाई भ्र. अंकुश मुळे
वय ४० वर्षे, रा. सरटी अंतरवाली ता. अंबड जि. जालना

ज्याअर्थी मयत सुदाम रामचंद्र तुपे हे/हया अनुक्रमे दिनांक २६/१०/२०२५ गेजी मौजे आगर नांदूर ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे कला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुगवा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सुदाम रामचंद्र तुपे, रा. आगर नांदूर ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०७/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- १६/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**जाहिर प्रगटण**
**मा. श्री. रविंद्र अ. मिसाळ, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. १, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४११ / २०२६**
**सय्यद मेहबुब सय्यद वि. मा. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सुरळेगाव**
**(मार्फत ॲड. ए. ए. आरबड)**

ज्याअर्थी अर्जदार नामे सय्यद मेहबुब सय्यद, रा. सुरळेगाव, ता. गेवराई यांनी गैरअर्जदार ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुरळेगाव ता. गेवराई, जि. बीड यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदाराचे वडील नामे मेहबुब यासीम सय्यद याचा मृत्यू दिनांक ०९/०६/ १९८६ रोजी मौजे सुरळेगांव येथे झाल्याबाबतची नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/१०/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्कयानिशी दिले.

पुढील तारीख :- १७/१०/ २०२६

**क. लिपीक**

शिक्का

**आदेशावरुन**
**सहा. अधिक्षक,**
**फौजदारी न्यायालय, गेवराई.**



## केज वकील संघाच्या निवडणुकीत

# ॲड.एम. लाड अध्यक्षासह संपूर्ण पॅनल विजयी

अंबाजोगाई प्रतिनिधी

दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी केज वकील संघाची कार्यकारिणी निवडणूक उत्साहपूर्ण व आनंदाच्या वातावरणात पार पडली. या निवडणुकीत संपूर्ण पॅनलने विजय मिळवत बाजी मारली. निवडून आलेल्या कार्यकारिणीत अध्यक्षपदासह उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष व ग्रंथपाल पदांचा समावेश आहे.

निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांची यादी याप्रमाणे ॲड. एम. एस. लाड - अध्यक्ष, ॲड.एस. एल. गलांडे - उपाध्यक्ष, ॲड. एस. एन. अंबाड - सचिव, ॲड. एन. वाय. थोरात - सहसचिव, ॲड. एस. एस. देशपांडे - कोषाध्यक्ष,ॲड. जे. जी. बारगजे - ग्रंथपाल

संपूर्ण पॅनल विजयी झाल्याने वकील बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे वकील संघातील सदस्य, ज्येष्ठ वकील तसेच विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे. नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून वकील बांधवांच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच संघाच्या प्रगतीसाठी प्रभावीपणे कार्य केले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१२३३ दि.२३.०९.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री अमोल काकासाहेब मैंद, रा.झिर्पी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **वडील** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | विराज अमोल मैंद | वडील | १२.०५.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-७८८ दि.१२.०८.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **प्रभु शिवनाथ सुखदेव रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आदिराज प्रभु सुखदेव | मुलगा | ०२.०६.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-११२९ दि. . .२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रौनक लायक सय्यद, रा.हिरडपुरी ता.पैठण जि.संभाजीनगर** यांनी यांच्या **नातु** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | हाशिम नदीम शेख | नातू | ०२.०५.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१९ दि. २६.०९.२०२५**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मुकूंद रामनाथ शिंदे, रा.लालवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रूद्र मुकूंद शिंदे | मुलगा | ०१.०७.२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# पावसाच्या ओढीने बीड जिल्हा होरपळला,केंद्रीय पथकासमोर दुष्काळाचे भीषण वास्तव उघड..!



## शेतीचे अर्थकारण कोलमडले, चारा केवळ १५ दिवसांचा, बिंदुसरा तलावात केवळ ५ टक्के साठा, शहरावर पाणीबाणी, फळबागा सुकल्या





हेक्टरी २ लाख रुपये तातडीच्या मदतीची मागणी..!!

बीड (जिमाका)

पावसाच्या प्रदीर्घ ओढीमुळे बीड जिल्ह्यातील दुष्काळाने गंभीर रूप धारण केले आहे. खरीप पिके करपली असून पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न तीव्र झाला आहे. केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने दोन दिवस जिल्ह्याचा दौरा केला. केंद्रीय कृषी मंत्रालयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल, राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग आणि जिल्हाधिकारी डॉ. विवेक जॉन्सन यांच्या पथकासमोर शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा आणि मागण्या मांडल्या.

तलाव कोरडे, शहरावर पाणीबाणी..

बीड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या बिंदुसरा तलावात सध्या केवळ ५ टक्के उपयुक्त साठा उरला आहे. गेल्या वर्षी याच काळात हे धरण १०० टक्के भरलेले होते. शहराला दररोज लागणाऱ्या ३८ एमएलडी पाण्यासाठी आता माजलगाव धरणावर अवलंबून राहावे लागणार आहे. उपलब्ध साठा केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. ग्रामीण भागात मोरगाव, वैद्यकिन्ही आणि दासखेड येथील पाझर तलाव कोरडे पडले असून विहिरींनी तळ गाठल्याने जलसंकट अधिक गडद झाले आहे.

५४ हजारांच्या खर्चातून हाती केवळ १० हजार..

सलग ६५ दिवस पावसाचा थेंबही न पडल्याने सोयाबीनचे पीक शेतकऱ्यांच्या डोळ्यांदेखत करपले. दासखेड येथील शेतकरी सुधाकर ठोंबरे यांनी तीन एकरांत ५४ हजार रुपये खर्चून पेरणी केली. मात्र त्यातून केवळ ९ ते १० हजार रुपयांचे (दीड-दोन क्विंटल) उत्पादन मिळण्याची शक्यता आहे. महिला शेतकरी रेखा कोकाटे यांच्या दीड-दोन एकरांत केवळ ४० किलो सोयाबीन निघेल, अशी स्थिती आहे. लाखो रुपये खर्चून उभ्या केलेल्या डाळिंब आणि मोसंबीच्या बागाही पाण्याअभावी जळण्याच्या मार्गावर आहेत.

चारा संपल्याने पशुधनाचे संकट..

खरिपाच्या नुकसानीसोबतच पशुधन कसे जगवायचे, हा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. पाटोदा तालुक्यातील बेडूकवाडी येथील वैभव आणि अंकुश शिंदे या बंधूंची व्यथा जिल्ह्यातील पशुपालकांचे प्रतिनिधित्व करणारी आहे. दररोज सुमारे १३० लिटर दूध संकलन करणाऱ्या या कुटुंबाकडे घरचा चारा केवळ १५ दिवस पुरेल इतकाच उरला आहे. बाहेरून चारा खरेदी करायचा तर प्रति टन ११ हजार रुपये मोजावे लागतात. सोयाबीनची वाढ खुंटल्याने नाइलाजाने हार्वेस्टरने काढणी करावी लागली, त्यामुळे जनावरांसाठी भुसकटही उपलब्ध नाही.

शेतकऱ्यांच्या मागण्या..

या संकटातून सावरण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी शेतकऱ्यांची आग्रही मागणी आहे. फळबागा जगवण्यासाठी हेक्टरी दोन लाख रुपयांची तातडीची मदत, शेततळ्यांसाठी ५० हजार रुपये अनुदान आणि जनावरांचे प्राण वाचवण्यासाठी तात्काळ 'चारा डेपो' सुरू करणे, या मागण्या त्यांनी लावून धरल्या. शासन या हतबल शेतकऱ्यांना कधी आणि किती दिलासा देणार, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

वैजाळ्यात पथकाचा शेतकऱ्यांशी संवाद..

पाटोदा तालुक्यातील वैजाळा येथे केंद्रीय पथकाने कांदा, झेंडू आणि मका उत्पादकांशी संवाद साधला. पाण्याअभावी पिकांची झालेली अवस्था, वाढत्या तापमानाचा परिणाम, उत्पादनातील घट आणि सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता याबाबत पथकाने माहिती घेतली.

कांदा उत्पादक बंकट शेवराव येडे यांनी पाणीटंचाईमुळे कांद्याची लागवड १० एकरांवरून यंदा केवळ एक एकरावर आणावी लागल्याचे सांगितले. शेततळ्यातही पाणी नसल्याने पिकाच्या भवितव्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. झेंडू उत्पादक पांडुरंग बाबासाहेब मस्के आणि मका उत्पादक काकासाहेब नामदेव येडे यांनीही वाढत्या तापमानामुळे झेंडूच्या फुलांचा आकार लहान होत असल्याचे आणि पावसाअभावी पिकांच्या वाढीवर परिणाम झाल्याचे सांगितले. पाण्याची प्रतीक्षा, घटते उत्पादन आणि वाढता खर्च अशा संकटांना तोंड देणाऱ्या शेतकऱ्यांच्या अनुभवांतून दुष्काळाची तीव्रता अधोरेखित झाली.

# पाणीटंचाईचा फटका कांदा, झेंडू आणि मक्याला !




बीड ।प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वैजाळा येथे केंद्रीय पथकाने कांदा, झेंडू आणि मका उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधून दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. पाण्याअभावी पिकांची झालेली अवस्था, वाढत्या तापमानाचा परिणाम, उत्पादनातील घट आणि सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता याबाबत पथकाने शेतकऱ्यांकडून माहिती घेतली.

कांदा उत्पादक बंकट शेवराव येडे यांनी पाण्याच्या टंचाईमुळे कांद्याची लागवड १० एकरांवरून यंदा केवळ एक एकरावर मर्यादित करावी लागल्याचे सांगितले. शेततळ्यातही पाणी नसल्याने पिकाच्या भवितव्याची चिंता त्यांनी व्यक्त केली.

झेंडू उत्पादक पांडुरंग बाबासाहेब मस्के आणि मका उत्पादक काकासाहेब नामदेव येडे यांच्याशीही पथकाने संवाद साधला. वाढत्या तापमानामुळे झेंडूच्या फुलांचा आकार लहान होत असून, पावसाअभावी पिकांच्या



वाढीवर परिणाम झाल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली.

पाण्याची प्रतीक्षा, घटते उत्पादन आणि वाढता खर्च अशा संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या व्यथा केंद्रीय पथकाने जाणून घेतल्या. शेतकऱ्यांच्या शेतातील परिस्थिती आणि त्यांच्या अनुभवांतून दुष्काळाची तीव्रता अधोरेखित झाली.

# तलवारीने वाढदिवसाला केक कापला,तलवारी सह २ खंजीर जप्त;केज पोलिसांची कारवाई

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील कोरेगाव येथील अजय अशोक तांदळे वय २६ वर्षे रा.कोरेगाव याने समाजात दहशत पसरविण्याच्या उद्देशाने आपल्या वाढदिवसानिमित्त तलवारीने केक कापतानाचा व्हीडिओ काढून हा व्हीडिओ समाज माध्यमावर व्हायरल केल्या प्रकरणी केज गुन्हा शाखेच्या पथकाने नामेवाडी येथिल सदाशिव नामदेव आंधळे रा.नामेवाडी व अजय अशोक तांदळे रा.कोरेगाव या दोघांना अटक केली असून एक तलवार व २ खंजीर मिळुन ७ हजार ५०० रुपयाचा मुद्देमाल गुन्हा शाखेच्या पथकाने जप्त केला आहे.या बाबत सविस्तर माहिती अशी की,दि. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजता वाढदिवस साजरा करताना अजय अशोक तांदळे वय २६ वर्षे रा.कोरेगाव याने आपल्या वाढदिवसाचा केक तलवारीने कापून समाजात दहशत पसरविण्याच्या उद्देशाने हा व्हिडिओ समाज माध्यमावर प्रसारीत केला.ही माहिती केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी या प्रकरणाची खातरजमा करण्याचा आदेश दिल्यावरून केज येथील गुन्हा शाखेच्या पथकाने नामेवाडी येथे शुक्रवारी दि.८ आक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या दरम्यान नामेवाडी येथे जाऊन चौकशी केली असता तलवार सदाशिव नामदेव आंधळे यांच्या घरी असल्याची माहिती मिळाल्यावर त्यांच्या घरी छापा मारून ४० इंच लांबीची तलवार,१० इंच लांबीचा एक खंजीर व ८ इंच लांबीचा एक खंजीर असा ७ हजार ५०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी जमादार बाळासाहेब अहंकारे यांच्या फिर्यादीवरून केज पोलिसात शुक्रवारी रात्री गुन्हा नोंद झाला असून दोन्ही आरोपीना अटक करण्यात आली आहे.



पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार बाळासाहेब अहंकारे हे पुढील तपास करीत आहेत.

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत,अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम, पोलीस निरीक्षक राहुल कामाजी सुर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि महेश क्षीरसागर,सपोनि लक्ष्मण दत्तात्रय उंबरे, ग्रेड पोलिस उप निरीक्षक अमीरोद्दीन इनामदार,जमादार बाळासाहेब अंहकारे, महिला जमादार कविता गायकवाड, जमादार संतोष गिते, शिवाजी कागदे, नितीन वारे,राहुल तरकसे,दादाराव देवगुडे यांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने ही कामगिरी केली आहे.

# विडा येथे फिरता मटका घेणाऱ्या बुकी चालकास रंगेहात पकडले;मटका किंग वर गुन्हा दाखल

## पोलीस प्रशासनाचा 'मटका बंद' असल्याचा दावा फोल ; सहाय्यक पोलीस अधीक्षकांच्या पथकाची कारवाइ

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यात मटका आणि अवैध धंदे पूर्णपणेबंद असल्याचा दावा पोलीस प्रशासनाकडून केला जात असला,तरी प्रत्यक्षात मात्र ग्रामीण भागात छुप्या पद्धतीने मटका जोमात सुरू असल्याचे पुन्हा एकदा उघडकीस आले आहे. तालुक्यातील विडा येथे चालता-फिरता मटका घेणाऱ्या एका बुकी चालकावर छापा टाकून पोलिसांनी त्याला रंगेहात पकडले असून,मुख्य मटका किंग वरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या कारवाईमुळे पोलिसांचा मटका बंद असल्याचा दावा साफ फोल ठरला आहे.या बाबत सविस्तर माहिती अशी की,विडा येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोर सार्वजनिक ठिकाणी एक इसम स्वतःच्या फायद्यासाठी चालता -फिरता कल्याण नावाचा मटका जुगार चालवत असल्याची गुप्त माहिती सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम यांना मिळाली होती.या माहितीच्या आधारे त्यांच्या आदेशावरून पोलीस जमादार अनिल मंदे आणि राजू गुंजाळ यांच्या पथकाने दि.७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११-३० वाजण्याच्या सुमारास अचानक छापा टाकला



या कारवाईत स्वप्नील कैलास वाघमारे रा. विडा याला मटक्याचे आकडे घेताना रंगेहात पकडण्यात आले,तर मटका लावणारे इतर लोक पोलिसांना पाहताच पळून गेले.

पोलिसांनी आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून मटक्याचे साहित्य,१ हजार ७६० रुपयांची रोख रक्कम आणि मोबाईल असा एकूण १५ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी मटक्याचे आकडे कोणाकडे देतो अशी कसून चौकशी केली असता हे आकडे गणेश खराडे रा.केज याला १० टक्के कमिशन वर देत असल्याची कबुली आरोपीने दिली.या प्रकरणी जमादार अनिल मंदे यांच्या फिर्यादीवरून स्वप्नील वाघमारे आणि मटका किंग गणेश खराडे या दोघांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास जमादार उमेश आघाव करत आहेत.केज तालुक्यात ग्रामीण भागात अशा प्रकारे छुप्या पद्धतीने मटका सुरू असल्याने अवैध धंदेवाल्यांवर कायमस्वरूपी चाप कधी बसणार,असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

# बसस्थानकात महिला कर्मचाऱ्याच्या गळ्यातील मिनी गंठन लंपास

परळी / प्रतिनिधी

परळी वैजनाथ बसस्थानकात बसमध्ये चढत असताना एका अनोळखी इसमाने आशा सुपरवायझर महिला कर्मचाऱ्याच्या गळ्यातील १२.५ ग्रॅम वजनाचे सुमारे १ लाख ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठन जबरदस्तीने हिसकावून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी संभाजी नगर,परळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनिता सतिष राऊत (वय ४० वर्षे, व्यवसाय: आशा सुपरवायझर, रा. सिरसाळा, ता. परळी वै., जि. बीड) या ५ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३:४५ वाजण्याच्या सुमारास परळी बसस्थानकावरून परळी ते पाथरी जाणाऱ्या बसमध्ये चढत होत्या. यादरम्यान त्यांच्या पाठीमागून आलेल्या एका अनोळखी इसमाने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मिनी गंठन (वजन १२.५ ग्रॅम, किंमत अंदाजे १,५०,००० रुपये) जबरदस्तीने हिसकावून पळ काढला.

या प्रकरणी फिर्यादी सुनिता राऊत यांच्या फिर्यादीवरून संभाजी नगर पोलीस ठाण्यात गु.र.न. २४४/२०२६, भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस.) कलम ३०४ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मिक्सरमध्ये १६ वर्षीय बालकामगाराचा मृत्यू, दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

## बाळराजे कन्स्ट्रक्शन प्रकरणी श्रमिक राष्ट्रीय कामगार सेनेची मागणी दोषींना पाठीशी घातल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा.!

बीड, प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील रुई (पिंपळा) येथील बाळराजे कन्स्ट्रक्शनच्या रेडी मिक्स कॉन्क्रीट प्लांटमध्ये मिक्सरमध्ये पडून १६ वर्षीय बालकामगार अमोल मच्छिंद्र जावळे (रा. खंडोबाचीवाडी, ता. वडवणी) याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना संतापजनक असून, या प्रकरणातील दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. तसेच संबंधित मालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी श्रमिक राष्ट्रीय कामगार सेनेचे बीड जिल्हाप्रमुख मनेश भोस्कर यांनी केली आहे. अल्पवयीन मुलाला रेडी मिक्स कॉन्क्रीटसारख्या धोकादायक ठिकाणी कामावर ठेवले जाणे ही गंभीर बाब आहे. कामगारांच्या सुरक्षेचे नियम पायदळी तुडवले जात असतील, तर अशा निष्काळजीपणाला जबाबदार असणाऱ्यांची गय करता कामा नये. अमोलचा मृत्यू केवळ अपघात म्हणून दुर्लक्षित न करता या घटनेच्या मुळाशी जाऊन सखोल चौकशी करावी, अशी भूमिका मनेश भोस्कर यांनी मांडली.

या दुर्घटनेनंतर प्लांटवरील कामगार व कर्मचारी घटनास्थळावरून निघून गेल्याचे, तसेच मृतदेह अनेक तास मिक्सरमध्ये अडकून राहिल्याचे वृत्त समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर दुर्घटनेच्या नेमक्या परिस्थितीची आणि संबंधितांच्या भूमिकेची चौकशी होणे आवश्यक आहे. अल्पवयीन अमोलला कामावर कोणी ठेवले? त्याच्या कामाची जबाबदारी कोणाकडे होती? प्लांटमध्ये सुरक्षेच्या कोणत्या उपाययोजना होत्या? दुर्घटनेनंतर जबाबदार व्यक्ती घटनास्थळी का उपस्थित नव्हत्या? या प्रश्नांची उत्तरे पोलिस आणि कामगार विभागाने शोधावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. अल्पवयीन मुलाला धोकादायक कामाच्या ठिकाणी ठेवून त्याच्या सुरक्षेबाबत निष्काळजीपणा झाला असल्याचे तपासात निष्पन्न झाल्यास संबंधित मालक, कंत्राटदार, प्लांट व्यवस्थापन आणि जबाबदार व्यक्तींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. परिस्थितीनुसार सदोष मनुष्यवधासह लागू होणाऱ्या सर्व कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हा दाखल करावा. तसेच बालकामगार प्रतिबंधक कायद्यानुसारही कारवाई करावी, अशी ठाम मागणी श्रमिक राष्ट्रीय कामगार सेनेने केली आहे.

या प्रकरणात केवळ एका व्यक्तीवर कारवाई करून प्रकरण संपवू नये. संपूर्ण यंत्रणेची जबाबदारी निश्चित करून दोषींना कायद्याच्या कक्षेत आणले पाहिजे, असेही भोस्कर यांनी स्पष्ट केले. कामगारांचे हक्क, सुरक्षितता आणि बालकामगारांच्या शोषणाविरोधातील लढा याबाबत श्रमिक राष्ट्रीय कामगार सेना कोणतीही तडजोड करणार नाही. या प्रकरणातील दोषींना पाठीशी घालण्याचा किंवा प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हाप्रमुख मनेश भोस्कर यांनी दिला. दरम्यान, मृत अमोल जावळे यांच्या कुटुंबाला तातडीने शासकीय मदत आणि नियमानुसार नुकसानभरपाई मिळवून द्यावी. बीड जिल्ह्यातील सर्व धोकादायक उद्योग, बांधकामस्थळे आणि रेडी मिक्स कॉन्क्रीट प्लांटची कामगार विभागाने विशेष तपासणी मोहीम राबवून पाहणी करावी. कुठेही बालकामगार आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही बीड जिल्हा श्रमिक राष्ट्रीय कामगार सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# केंद्रीय पथकाकडून मोरगाव परिसरातील पाणीटंचाईची पाहणी, पाझर तलाव कोरडा

## जलसंधारण, पाणीपुरवठा आणि पीक नुकसानीचा घेतला आढावा

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने बीड तालुक्यातील मोरगाव परिसरातील पाणीटंचाई, जलसंधारणाची कामे आणि शेतीपिकांच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी मोरगाव येथील दराडे वस्तीवरील पाझर तलावाची तसेच परिसरातील विहिरींची पाहणी करून पाणी उपलब्धतेची स्थिती जाणून घेण्यात आली.

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव तथा पथकप्रमुख मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील पथकाने या भागातील परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी पथकाला पाझर तलावाची क्षमता आणि सद्यस्थितीची माहिती दिली.

पाझर तलावात पाणीसाठा शून्य..

मोरगाव येथील नागनाथ मंदिराजवळ असलेल्या पाझर तलावाची पाणी साठवण क्षमता ०.१२१ टीएमसी आहे. मात्र, सध्या या तलावात पाणीसाठा शून्य असल्याचे पाहणीत निदर्शनास आले. तलाव पूर्णपणे कोरडा पडल्यामुळे परिसरातील पाणीटंचाईची तीव्रता स्पष्ट झाली. पथकाने तलावाची स्थिती जाणून घेत जलसंधारणाच्या कामांची आवश्यकता आणि उपलब्ध पाणीस्रोतांच्या स्थितीबाबत माहिती घेतली.

विहिरीची पाहणी, पाणी उपलब्धतेची माहिती..

पथकाने परिसरातील प्रभू दराडे या शेतकऱ्याच्या विहिरीचीही पाहणी केली. यावेळी विहिरीतील पाण्याची पातळी, उन्हाळ्यातील पाणी उपलब्धता आणि पाण्याच्या उपशामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत स्थानिकांकडून माहिती घेण्यात आली. परिसरातील पाणीपुरवठा आणि टँकरच्या वापराबाबतही चर्चा झाली.

पाणीपुरवठ्याच्या देयकांचा प्रश्न वेळेत मार्गी न लागल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवण्यात अडचणी येऊ शकतात, अशी बाब स्थानिकांनी मांडली. तसेच, मोठ्या प्रमाणावर पाण्याचा उपसा होत असल्याने भूजलसाठा आणि विहिरींच्या पाणी





उपलब्धतेवर परिणाम होत असल्याच्या मुद्द्यांवरही चर्चा करण्यात आली.

खंडाळा तलावाचीही पाहणी..

पथकाने खंडाळा तलावाची पाहणी करून तेथील पाण्याची स्थिती आणि स्थानिक पाणीपुरवठ्याबाबत माहिती घेतली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलस्रोतांचा वापर, पाणीसाठ्याचे नियोजन आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा यासंबंधीच्या अडचणी स्थानिकांनी निदर्शनास आणून दिल्या.

जलसंधारणाच्या कामांचा आढावा..

यावेळी तलावांमधील गाळ काढणे आणि जलसंधारणाची कामे करण्यासाठी उपलब्ध निधी व योजनांबाबतही चर्चा झाली. यासाठी जिल्हा नियोजनासह विविध निधी स्रोत आणि कॉर्पोरेट सामाजिक दायित्व (सीएसआर) निधीचा वापर करण्याची शक्यता विचारात घेण्याबाबत चर्चा करण्यात आली.

जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभागांतर्गत ६२५ पाझर तलाव आणि ५५ सिंचन तलाव असल्याची माहिती देण्यात आली. पाझर तलावांचा मुख्य उद्देश भूजल पातळी वाढविणे हा असून, अशा तलावांमधून थेट सिंचनासाठी पाणी सोडण्याची व्यवस्था नसते, असेही स्पष्ट करण्यात आले.

पाणीपुरवठा योजनेच्या प्रलंबित कामाचा प्रश्न..

पाहणीदरम्यान मोरगावचे सरपंच लिंबाजी जाधव यांनी गावातील जलजीवन मिशन व पाणीपुरवठा योजनेचे काम गेल्या चार ते पाच वर्षांपासून प्रलंबित असल्याची समस्या मांडली. संबंधित ठेकेदाराकडून काम पूर्ण होत नसल्याने ग्रामस्थांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणाची माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले.

अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकाचे नुकसान..

पथकाने परिसरातील शेतीपिकांच्या नुकसानीचीही माहिती घेतली. मोरगाव येथील शेतकरी रमेश विश्वनाथ कोकाटे यांच्या गट क्रमांक ३१/२ मधील सोयाबीन पिकाचे अतिवृष्टीमुळे ८० ते ९० टक्के नुकसान झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची यादी तयार करण्याचे काम सुरू असून, त्यासाठी शेतकऱ्यांची नावे, गट क्रमांक, आधार क्रमांक आणि बँक खात्याची माहिती संकलित केली जात असल्याचे संबंधित कर्मचाऱ्यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई, भूजलसाठा, जलसंधारणाची कामे, पाणीपुरवठा योजनांची सद्यस्थिती आणि शेतीपिकांचे नुकसान या विविध बाबींची प्रत्यक्ष पाहणी करून केंद्रीय पथकाने मोरगाव परिसरातील परिस्थितीचा आढावा घेतला.

# तीन एकरांत ५४ हजारांचा खर्च, हाती मात्र १० हजारांचे सोयाबीन..?





## दासखेडमध्ये केंद्रीय पथकासमोर शेतकऱ्यांची व्यथा.. पिके करपली, विहिरी कोरड्या, फळबागांवरही संकट

बीड ।प्रतिनिधी

पेरणी, बियाणे, खते आणि फवारण्यांवर हजारो रुपये खर्च करूनही पावसाअभावी सोयाबीनचे पीक करपले. तीन एकरांत ५४ हजार रुपये खर्च करून हाती केवळ ९ ते १० हजार रुपयांचे उत्पादन येण्याची शक्यता आहे. बीड जिल्ह्यातील दासखेड येथे केंद्रीय पथकाने पाहणी केली असता शेतकऱ्यांच्या या व्यथा समोर आल्या.

सुधाकर नवनाथ ठोंबरे यांनी तीन एकरांत सोयाबीनची पेरणी केली. मात्र जेमतेम दीड ते दोन क्विंटल उत्पादन मिळण्याची शक्यता आहे. तर बबनराव ठोंबरे यांच्या अडीच एकरांतील सोयाबीनमधून केवळ ६० ते ७० किलो उत्पादन मिळेल, अशी स्थिती आहे.

पावसाअभावी विहिरी कोरड्या पडल्या असून, जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न गंभीर झाला आहे. हार्वेस्टरने काढणी केल्याने भुसकट गोळा करता येत नसल्याने चाऱ्याची अडचण अधिकच वाढली आहे.

शेततळ्यांसाठी ५० हजार रुपये अनुदान आणि फळबागांसाठी हेक्टरी दोन लाख रुपये मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. डाळिंब व मोसंबीच्या बागा पाण्याअभावी सुकण्याच्या मार्गावर असल्याने वेळेत मदत मिळाली नाही, तर मोठे नुकसान होण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली.खर्च मोठा, उत्पादन नगण्य आणि चारा-पाण्याची चिंता दासखेडमधील शेतकऱ्यांची ही व्यथा दुष्काळाची तीव्रता अधोरेखित करते.

# बीड जिल्ह्यातील स्वयंचलित हवामान केंद्राची केंद्रीय पथकाकडून पाहणी





बीड ।प्रतिनिधी

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने १० ऑक्टोबर रोजी सकाळी पाली (ता. जि. बीड) येथील स्वयंचलित हवामान केंद्राला भेट देऊन यंत्रणेच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली.

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव तथा पथकप्रमुख मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील पथकाने हवामान केंद्रावरील तापमान, आर्द्रता, वाऱ्याचा वेग व दिशा आणि पर्जन्यमान नोंदविण्याच्या यंत्रणेची माहिती जाणून घेतली. या केंद्रातून दर दहा मिनिटांनी हवामानविषयक माहिती संकलित केली जाते.

यावेळी राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग आणि जिल्हाधिकारी डॉ. विवेक जॉन्सन उपस्थित होते. जिल्ह्यातील ७९ महसूल मंडळांमध्ये स्वयंचलित हवामान केंद्रे कार्यरत असून, या यंत्रणेद्वारे जिल्ह्यातील पर्जन्यमानाची आकडेवारी संकलित केली जाते, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी दिली.

यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी पावसाअभावी निर्माण झालेली गंभीर परिस्थिती पथकासमोर मांडली. पिण्याच्या पाण्यासह जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याची तातडीने व्यवस्था करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. दुष्काळामुळे ग्रामीण भागात निर्माण झालेल्या पाणीटंचाईची तीव्रताही



# चारा जेमतेम १५ दिवसांचा, पुढे जनावरांना खाऊ घालायचे काय.. ?

## बेडूकवाडीतील शिंदे बंधूंची व्यथा चारा महागला, पशुधन जगविण्याची चिंता वाढली.. !

बीड ।प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील बेडूकवाडी येथील वैभव अंकुश शिंदे आणि अंकुश परसराम शिंदे यांच्यासमोर दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होत आहे. सध्या घरचा ज्वारीचा कडबा आणि नेपियर गवत उपलब्ध असले, तरी चारा संपल्यानंतर जनावरांना जगवायचे कसे, हा प्रश्न त्यांना सतावत आहे. अशीच परिस्थिती जवळपास सर्वच शेतकऱ्यांची झालेली आहे.

बाहेरून चारा विकत घ्यायचा झाल्यास प्रति टन ११ हजार रुपये खर्च येतो. दररोज सुमारे १३० लिटर दूध संकलन करणाऱ्या या शेतकऱ्यांसाठी वाढता चारा खर्च मोठे आर्थिक आव्हान ठरत आहे. त्यामुळे भविष्यात चारा टंचाई निर्माण झाल्यास शासनाने चारा डेपो सुरू करून मदत करावी, अशी अपेक्षा आहे.पशुधन हेच शेतकऱ्यांचे बळ मात्र चारा-पाण्याची चिंता वाढली, तर हे बळ टिकवायचे कसे ? हा प्रश्न भेडूकवाडीतील शेतकऱ्यांच्या व्यथेतून समोर येत आहे.

## ६५ दिवसांपासून पावसाचा थेंब नाही !

# वैद्यकिन्हीतील दुष्काळाची दाहकता केंद्रीय पथकासमोर, पिकांचे नुकसान, वाढलेला चाऱ्याचा खर्च आणि पाणीटंचाईचे भीषण वास्तव

बीड ।प्रतिनिधी

कधी अतिवृष्टीने पिकांचे नुकसान, तर कधी पावसाअभावी हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो निसर्गाच्या या चक्रात शेतकरी मात्र आर्थिक संकटात सापडतो आहे. बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही गावात गेल्या ६५ दिवसांपासून पावसाचा थेंबही पडलेला नाही. त्यामुळे सोयाबीनचे पीक वाया गेले असून, पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्नही गंभीर झाला आहे.

केंद्रीय पथकाच्या पाहणी दरम्यान उपविभागीय अधिकारी वसिमा शेख यांनी वैद्यकिन्ही येथील शेतात जाऊन पिकांच्या स्थितीची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीची माहिती घेण्यात आली.

दोन हेक्टरमध्ये सोयाबीन, यंदा उत्पादनाची आशाच मावळली !

शेतकरी देवीदास भानदास यांच्या दोन हेक्टर क्षेत्रातील सोयाबीन पिकाची पाहणी करण्यात आली. सर्वसाधारण परिस्थितीत या क्षेत्रातून अपेक्षित उत्पादन मिळण्याची आशा असते मात्र यंदा पावसाअभावी पीकच आले नसल्याची व्यथा त्यांनी मांडली.





गेल्या वर्षी अतिपावसामुळे नुकसान झाले, तर यंदा पाऊसच नसल्याने पिके वाया गेली. सलग दोन वर्षांच्या या संकटामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणी उभ्या राहिल्या आहेत.

जनावरांच्या चारा-पाण्यासाठीही संघर्ष..

गावात पाणीटंचाई तीव्र झाली असून, जनावरांसाठी पाणी आणि चारा उपलब्ध करणे कठीण झाले आहे. चाऱ्याची किंमत चार हजार रुपये प्रतिटन झाल्याने पशुपालकांवरील आर्थिक भार वाढला आहे.

पाण्यासाठी जुन्या विहिरीचा आधार घ्यावा लागत असून, तेथेही दिवसातून केवळ तीन ते साडेतीन तास पाणी उपलब्ध होते. काही ठिकाणी पाटोदा येथून सुमारे ४० किलोमीटर अंतरावरून पाणी आणावे लागत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

पीक विम्याबाबतही शेतकऱ्यांच्या अडचणी

गेल्या वर्षी गावातील सुमारे ८० टक्के शेतकऱ्यांनी पीक विमा भरला होता; मात्र मदत मिळाली नसल्याने यंदा विमा भरणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण सुमारे ४० टक्क्यांवर आल्याची माहिती स्थानिक प्रतिनिधींनी दिली.

दरम्यान, गावातील एकूण १,१०० हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे ९५० हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची लागवड आहे. पिकांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू असून, उर्वरित क्षेत्रातील अन्य पिकांच्या नुकसानीचीही नोंद घेतली जात आहे, अशी माहिती तलाठी देशमुख यांनी दिली.

६५ दिवसांचा पावसाचा खंड, हातचे गेलेले पीक आणि जनावरांच्या चारा-पाण्याची चिंता वैद्यकिन्हीतील परिस्थिती दुष्काळाचे गांभीर्य अधोरेखित करते. आता या संकटातून सावरण्यासाठी शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या उपाययोजनांची अपेक्षा आहे.कधी अतिवृष्टीने पिकांचे नुकसान, तर कधी पावसाअभावी हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो निसर्गाच्या या चक्रात शेतकरी मात्र आर्थिक संकटात सापडतो आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आंतर-महाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेत आदित्य कृषी महाविद्यालयाला सुवर्णपदक

## आदित्य महाविद्यालयात स्पर्धा मराठवाड्यातील १४ संघांचा उत्स्फूर्त सहभाग




प्रतिनिधी । बीड

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत आदित्य कृषी, जैवतंत्रज्ञान, अन्नतंत्र व कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर-महाविद्यालयीन बास्केटबॉल (मुले व मुली) स्पर्धेचे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात ५ ऑक्टोबर रोजी पार पडल्या. प्रथमच ही स्पर्धा वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या मुख्यालय परिसराच्या बाहेर आयोजन करण्यात आली होती. एकाच दिवशी मुलांच्या व मुलींच्या दोन्ही गटांच्या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत मराठवाड्यातील १४ संघ सहभागी झाले होते. आदित्य कृषी महाविद्यालयाच्या मलींच्या संघाने सुवर्णपदक पटकावले.

स्पर्धेच उद्घाटन विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम यांच्या हस्ते झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालक डॉ. आदिती सारडा होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रात सक्रिय सहभाग घेऊन महाविद्यालयाचे तसेच विद्यापीठाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन केले. तसेच त्यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठचे परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्र मनी सर यांनी सदरील स्पर्धेचे आयोजनाची संधी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानून आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे खेळा प्रतीचे प्रेम पाहून आभार व्यक्त केले.

सदरील स्पर्धेसाठी आलेल्या संघ व्यवस्थापक व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाने केलेला नाष्टा जेवण व इतर व्यवस्थेबद्दल कौतुक केले.स्पर्धेत मुलांचे ८ संघ आणि मुलींचे ६ संघ, अशा एकूण १४ संघांनी सहभाग नोंदविला. विविध महाविद्यालयांतील खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक कौशल्य, शिस्त, आत्मविश्वास आणि क्रीडाभावनेचे दर्शन घडविले. मैदानावर झालेल्या चुरशीच्या लढतींमुळे स्पर्धेचा उत्साह शिगेला पोहोचला. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य कृषी, जैवतंत्रज्ञान, अन्नतंत्र व कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय, बीड येथील प्राचार्य, प्राध्यापक, क्रीडा विभाग, कर्मचारी यांनी उत्कृष्टरित्या केले.

मुलींच्या सघात बीड विजेता परभणी ठरला उपविजेता

आदित्य कृषी महाविद्यालय, बीड विजेते तर कृषी महाविद्यालय, परभणी उपविजेते ठरला. मुलांचा संघामध्ये कृषी महाविद्यालय, परभणी विजेते तर उपविजेते अन्नतंत्र महाविद्यालय, परभणी ठरला.

खेळाडूंनी अभ्यासासोबत नेतृत्वगुण जोपासावेत : डॉ. राजेश कदम

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम म्हणाले की, अमृतकाळातील विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक प्रगतीवर भर न देता सांघिक खेळांच्या माध्यमातून नेतृत्वगुण, शिस्त, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता आत्मसात केली पाहिजे. खेळामुळे संघभावना निर्माण होऊन जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याचे बळ मिळते.



# जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत अंकुशराव टोपे महाविद्यालयाची बाजी

जालना शेख फारुक :- जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत अंकुशराव टोपे महाविद्यालयाच्या क्रिकेट संघाने दमदार कामगिरी करत दणदणीत विजय मिळविला. या विजयाच्या जोरावर संघाने विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्रता मिळवली असून महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एका मानाच्या तुऱ्याची भर पडली आहे.जिल्हास्तरीय स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे दर्शन घडवत विजयावर शिक्कामोर्तब केले. संघातील खेळाडूंची जिद्द,मेहनत आणि सांघिक कामगिरी यामुळे हे यश संपादन करता आले. आता विभागीय स्तरावरील स्पर्धेतही अशीच चमकदार कामगिरी करण्याचे आव्हान संघासमोर असणार आहे.

विजयी संघात गुणवंत खेळाडूंचा समावेश

या विजयी संघात राफे सौदागर,राज ठाकूर,रोहन धनवटे,सचिन पवार,अर्शद पठाण,कुमार गैरवाल,तन्मय नरवणकर,राजवीर घाटगे, अमान शेख,मस्तकिम शेख, शेख साईम,शौर्य कुरिल, मुकीद शेख,दय्यान शेख आणि शुभम खाडे या खेळाडूंचा समावेश आहे.

मान्यवरांकडून खेळाडूंचे अभिनंदन संघाने मिळविलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आरोग्यमंत्री मा.आ. राजेशभैय्या टोपे,संस्थेच्या सचिव सौ.मनीषाताई टोपे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील, उपप्राचार्य प्रा.पांडुरंग खोजे, क्रीडा विभागप्रमुख डॉ.भुजंग डावकर,पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर,डॉ. सुदर्शन तारख, क्रीडा शिक्षक प्रा. चंद्रकांत लाटेकर, डॉ. शंकर तिकांडे, प्रा. शौकत शेख, डॉ. विजय कुमठेकर, प्रा. योगेश नागवे आणि प्रा. अंकुश गडदे यांनी खेळाडूंचे व प्रशिक्षक राज पवार यांचे अभिनंदन केले.

या यशाबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनीही विजयी संघाचे कौतुक केले. विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या या संघाकडून पुढील फेरीतही दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे.



# केज डव्होकेट बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी पुन्हा ॲड.एम.एस.लाड

केज/प्रतिनिधी

केज येथील डव्होकेट बार असोसिएशन,केजच्या सन २०२६-२०२७ या वर्षाच्या नवीन कार्यकारणीची निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली असून,शनिवार,दि. ०९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ०५-०० वाजता मत मोजणी पूर्ण करून अधिकृत निकाल जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये अध्यक्षपदी ड.एम.एस.लाड यांची पुन्हा निवड झाली आहे.या निवडणुकीत अध्यक्ष पदासह उपाध्यक्ष, सचिव,सहसचिव, कोषाध्यक्ष आणि ग्रंथपाल या पदांसाठी चुरशीची लढत पाहायला मिळाली. मतमोजणी अंती जाहीर झालेला निकाल पुढीलप्रमाणे आहे.अध्यक्ष ड.एम.एस.लाड यांनी ९० मते मिळवून त्यांनी विजय मिळवला.त्यांचे प्रतिस्पर्धी ड.सी.डी. खंदारे यांना ६१ मते मिळाली (३ मते बाद)

उपाध्यक्ष ड.एस. एल.गलांडे हे ९१ मते घेऊन विजयी ठरले. त्यांचे प्रतिस्पर्धी ड. पी.एच.नाईकवाडे यांना ६० मते मिळाली (३ मते बाद),सचिव ड.एस.एन.अंबाड यांनी ८७ मते मिळवत विजय संपादन केला. तर ड.डी.आर. सिरसट यांना ६४ मते मिळाली (३ मते बाद),

सहसचिव ड.एन. वाय.थोरात हे ९५ मते घेऊन विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी ड. ए.ए.धपाटे यांना ५६ मते मिळाली (३ मते बाद),कोषाध्यक्ष ड. एस.एस.देशपांडे यांनी ७८ मते मिळवून बाजी मारली.तर ड.एन.ए. खाडे यांना ७४ मते मिळाली (२ मते बाद),

ग्रंथपाल ड.जे.जी. बारगजे यांनी ८७ मते घेत विजय मिळवला. त्यांचे प्रतिस्पर्धी ड. पी.जी.देशमुख यांना ६२ मते मिळाली (५ मते बाद) मुख्य निवडणुक निर्णय अधिकारी अड.एम. वाय.घुले,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अड.आर. एम.गायकवाड व अड.एन.एच.नेहरकर यांनी काम पाहिले.

निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या उपस्थितीत ही मत मोजणी प्रक्रिया पार पडली असून अधिकृत निकाल पत्रकावर स्वाक्षऱ्या करून निकालाची घोषणा करण्यात आली. नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांचे बार असोसिएशनच्या सदस्यांनी व वकील बांधवांनी अभिनंदन करून पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अश्विनीताई भांडेकर यांच्या पुढाकारातून महिला बचत गटांना आर्थिक बळ

## आमदार सुरेश धस यांच्या हस्ते ३५ गटांना ५० लाखांचे कर्जवाटप




मानूर (प्रतिनिधी)

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना उद्योग-व्यवसायाच्या माध्यमातून स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने शिरूरकासार नगरपंचायत आणि भारतीय स्टेट बँकेच्या संयुक्त विद्यमाने सिद्धेश्वर संस्थानच्या सभागृहात शुक्रवारी (ता. ९) महिला बचत गट मेळावा व कर्जवाटप समारंभ आयोजित करण्यात आला. या वेळी शहरातील ३५ महिला बचत गटांतील ३५० महिलांना एकूण ५० लाख रुपयांच्या कर्जवाटपाचे धनादेश आमदार सुरेश धस आण्णा व मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. नगरसेविका अश्विनीताई गणेश (बप्पा) भांडेकर यांच्या पुढाकारातून आयोजित या मेळाव्याला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आमदार सुरेश धस यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. नगराध्यक्ष प्रतिभाताई रोहिदास गाडेकर अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महंत विवेक महाराज शास्त्री, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी गणेश दहिफळे, चंपावती पानसंबळ, शिवाजी पवार, अमित धुळे, भारतीय स्टेट बँकेचे व्यवस्थापक प्रवीण हसे, सुरेश उगलमुगले, रोहिदास गाडेकर पाटील, गटनेते गणेश भांडेकर आणि फयाज शेख उपस्थित होते.

प्रास्ताविकात नगरसेविका अश्विनीताई भांडेकर यांनी महिला बचत गटांच्या स्थापनेपासून कर्जमंजुरीपर्यंतचा प्रवास मांडला. शिरूर शहरातील ३५ बचत गटांतील ३५० महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रयत्न सुरू असून, महिलांना स्वतःचे उद्योग उभारता यावेत, यासाठी प्रशिक्षण व आवश्यक सहकार्य मिळावे, अशी मागणी त्यांनी आमदार सुरेश धस यांच्याकडे केली.महिला बचत गटांनी मिळालेल्या कर्जाचा उपयोग भांडवल म्हणून करून कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीबरोबरच स्वतःचा उद्योग उभारण्यावर भर द्यावा, असे आवाहन आमदार धस यांनी केले. महिलांना उद्योग उभारणीसाठी प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.भारतीय स्टेट बँकेचे व्यवस्थापक प्रवीण हसे यांनी कर्जाचा योग्य विनियोग करून व्यवसायवृद्धी साधण्याचे आवाहन केले. सध्या ५० लाख रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले असून, महिला बचत गटांना दोन कोटी रुपयांचे कर्ज देण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.महिलांना आर्थिक स्वावलंबनाची संधी उपलब्ध करून देणे, बचतीची सवय वाढविणे आणि उद्योगाच्या माध्यमातून कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालणे, या दृष्टीने हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरला. कार्यक्रमाला महिला बचत गटांच्या सदस्यांसह नगरपंचायत नगरसेवक, पदाधिकाऱ्यांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.अश्विनीताई भांडेकर यांच्या पुढाकारातून महिलांना स्वावलंबनाची नवी दिशाशिरूरकासार शहरात नगरसेविका अश्विनीताई गणेश बप्पा भांडेकर यांच्या पुढाकारातून प्रथमच महिला बचत गटांचा भव्य मेळावा आणि मोठ्या प्रमाणावर कर्जवाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. शहरातील ३५ महिला बचत गटांतील ३५० महिलांना ५० लाख रुपयांचे कर्ज मिळाल्याने त्यांच्या उद्योग-व्यवसायाच्या स्वप्नांना आर्थिक बळ मिळाले आहे. महिलांनी केवळ बचतीपुरते मर्यादित न राहता स्वतःचा व्यवसाय सुरू करावा, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे आणि कुटुंबाच्या प्रगतीत योगदान द्यावे, या उद्देशाने अश्विनीताई भांडेकर यांनी हा उपक्रम पुढाकाराने आयोजित केला. या भव्य कार्यक्रमाला महिलांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

## गोदावरीच्या काठावरच तहानलेली गावे

# आपेगाव,बळेगाव,साष्ट पिंपळगाव परिसरात दुष्काळाच्या झळा तीव्र पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर




पाण्याचा स्रोत जवळ तरीही घशाला कोरड दुष्काळाच्या संकटाने ग्रामस्थ हवालदिल

अंबड (प्रतिनिधी)

एकीकडे गोदावरी नदीचा काठ आणि दुसरीकडे पिण्याच्या पाण्यासाठी होणारी वणवण अशी विरोधाभासी परिस्थिती आपेगाव,बळेगाव आणि साष्ट पिंपळगाव परिसरातील गावांसमोर उभी ठाकली आहे.दुष्काळाच्या वाढत्या झळांमुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई अधिक गंभीर बनत असून दुसरीकडे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही बिकट होत चालला आहे. पाण्यासाठी ग्रामस्थांची धावपळ आणि जनावरांच्या चाऱ्यासाठी शेतकऱ्यांची सुरू असलेली कसरत यामुळे ग्रामीण जनजीवनावर संकटाचे सावट गडद झाले आहे.गोदावरी जवळ तरी पाण्यासाठी संघर्ष

गोदावरी नदीच्या परिसरात वास्तव्यास असलेल्या गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवणे ही बाब चिंताजनक आहे. नदीकाठचा परिसर असूनही नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत असेल तर पाणीपुरवठ्याच्या नियोजनाचा आणि उपलब्ध जलस्रोतांच्या प्रभावी वापराचा प्रश्न ऐरणीवर येतो.उन्हाच्या तीव्रतेत आणि दुष्काळी परिस्थितीत पाण्याची गरज वाढत असताना ग्रामस्थांच्या अडचणींकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी

दुष्काळाचा परिणाम केवळ माणसांच्या पिण्याच्या पाण्यापुरता मर्यादित राहत नाही तर पशुधनाच्या जगण्याचाही प्रश्न निर्माण होतो.हिरवा चारा आणि पाण्याची उपलब्धता कमी झाल्यास शेतकऱ्यांसमोर जनावरांचे संगोपन कसे करायचे हा मोठा प्रश्न उभा राहतो.शेतीच्या अनिश्चिततेत पशुधन सांभाळण्याची जबाबदारीही वाढत असल्याने शेतकरी आर्थिक आणि मानसिक संकटाचा सामना करत आहेत.त्यामुळे चारा उपलब्धता पाण्याचे नियोजन आणि आवश्यक मदत याबाबत तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.दादासाहेब चौधरी, अनिल चौधरी,संदीपान चौधरी आणि पोलीस पाटील केदारनाथ चौधरी यांच्यासह स्थानिक पातळीवरील नागरिकांनी या परिसरातील पाणीटंचाई व चाऱ्याच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज अधोरेखित केली आहे.ग्रामस्थांच्या अडचणी दूर करण्यासाठी संबंधित विभागांनी प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.प्रशासनाने आता ठोस पावले उचलावीत

आपेगाव,बळेगाव आणि साष्ट पिंपळगाव परिसरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी उपलब्ध जलस्रोतांचा आढावा गरजेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा, विहिरी व अन्य स्रोतांची स्थिती तपासणे आणि जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. केवळ परिस्थितीचा आढावा घेण्यापेक्षा ग्रामस्थांना प्रत्यक्ष दिलासा मिळेल अशा उपाययोजना महत्त्वाच्या ठरणार आहेत.

दुष्काळाचे संकट गडद होण्यापूर्वीच प्रशासनाने सतर्क होऊन पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठी चारा या मूलभूत गरजांची पूर्तता करावी. गोदावरीच्या काठावरील गावांना पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागू नयेत यासाठी नियोजनबद्ध आणि परिणामकारक कृती होणे हीच ग्रामस्थांची अपेक्षा आहे.




# संभाव्य पाणी टंचाई निवारणार्थ विद्यूत पुरवठा केला खंडीत !

तहसिलदार यांची धडक मोहीम ,सहा डीपी वरील कनेक्शन तोडले !

मानूर (प्रतिनिधी)

शिरूर कासार तालुक्यात दिवस आला तसा जातोय ,उन्हाचा पारा चढताच राहतोय अशा परिस्थितीत भविष्यात पाणी कसे आणि कुठून आणणार ही गंभिर समस्या असतांना आहे तो अल्पसा पाणीसाठा उपसा होऊ नये यासाठी तहसिलदारांनी कठोर पाऊले उचलून शनिवारी सहा डीपी वरील विद्यूत पुरवठा खंडीत केला आहे .

शिरूर कासार तालुक्यात यंदा अत्यल्प पाऊस पडल्याने नव्या पाण्याच्या थेंबाची देखील आवक झाली नाही उलट पिक वाचवण्यासाठी शेतकऱ्यांनी धडपड केली मात्र खरिपाचा हंगाम हातातून गेलाच ,रब्बी पेरा होईल का नाही याची अजुनही शास्वती नाही ,जनावरांना चारा आणि पिण्यासाठी पाणी हे प्रश्न अत्यंत गंभिर बनणार आहे ,यासाठी उपलब्ध पाणी साठा जपुन वापरणे ही गरज बनली आहे आणि यावर आता प्रशासनाची करडी नजर असुन

वेळ प्रसंगी गुन्हे दाखल करण्याची व साहित्य जप्त करण्याची भुमिका देखील घेतली असल्याचे आवाहन केले जात आहे ,याउर पाणी उपसा करण्यासाठी लागणारा विजपुरवठाच खंडीत करण्याच्या भुमिकेची अमंलबजावणी फुलसांगवी शिवारात तलाव परिसरात बुडीत क्षेत्रात असणाऱ्या विहिरीवरून पाणी उपसा होऊ नये म्हणून तलाव परिसरातल्या सहा डीपीवरचा विद्यूतपुरवठा खंडीत केला आहे .

भविष्यातील पाण्याचे संकट लक्षात घेता सर्वांनी पाणी जपुन ठेवण्याची गरज आहे ,पाणी उपसा करतांना निदर्शनास आलेच तर कारवाई अटळ असल्याने हे धाडस कुणीही करू नये असे आवाहन तहसीलदार सुरेश घोळवे यांनी केले आहे.

## स्थानिक गुन्हे शाखा बीडची अमली पदार्थांविरुद्ध मोठी कारवाई

# नवगण राजुरी येथे तब्बल ६० किलो गांजा जप्त, ३० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

अमली पदार्थमुक्त बीड जिल्ह्यासाठी नागरिकांनी पुढे यावे- बीड पोलीस दलाचे जनतेला आवाहन

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अवैध धंदे, अमली पदार्थांची तस्करी, साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध मा. पोलीस अधीक्षक, बीड श्री. नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे नवगण राजुरी येथे मोठी कारवाई करून ६० किलो ७० ग्रॅम गांजा, किंमत ३० लाख ३ हजार ५०० रुपये, जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, मौजे नवगण राजुरी, ता. जि. बीड येथील गौसखान उर्फ बाबू उमरखान पठाण, वय ६० वर्षे याने त्याच्या राहत्या घरामध्ये अवैध विक्री करण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात गांजा साठवून ठेवला आहे.

सदर माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक ०९/१०/२०२६ रोजी रात्री १०.१५ वाजण्याच्या सुमारास मौजे नवगण राजुरी येथील संबंधित घरावर छापा टाकला. घरामध्ये चार वेगवेगळ्या गोण्यांमध्ये साठवून ठेवलेला हिरवट रंगाचा, पाने, फुले, बिया व बोंडे असलेला गांजासदृश अमली पदार्थ मिळून आला. सदर अमली पदार्थाचे इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर वजन केले असता एकूण ६० किलो ७० ग्रॅम गांजा, अंदाजे किंमत ३०,०३,५००/- रुपये असल्याचे निष्पन्न झाले. सदर मुद्देमाल कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपी गौसखान उर्फ बाबू उमरखान पठाण याच्याविरुद्ध पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे गु.र.नं. ३७८/२०२६, कलम ८(ल), २०(ल) (ळळ) (उ) एनडीपीएस कायदा, १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरील आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस ठाणे बीड ग्रामीण करीत आहेत.



बीड जिल्ह्यात अमली पदार्थांची विक्री, वाहतूक व साठवणूक करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही अशाच प्रकारे कठोर कारवाई सुरू राहणार असून अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायाला कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही. अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या व्यक्ती, त्यांचे पुरवठादार, वाहतूकदार तसेच या अवैध व्यवसायासाठी वापरली जाणारी ठिकाणे याबाबत नागरिकांनी निर्भयपणे अंमली पदार्थ विरोधी कक्ष संपर्क क्रमांक ९२७०२४३२०० वर माहिती द्यावी. माहिती देणाऱ्या नागरिकांची ओळख गोपनीय ठेवण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यात येईल. प्राप्त माहितीची खातरजमा करून संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

बीड जिल्ह्यातील अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायाचे उच्चाटन करण्यासाठी बीड पोलीस दल कटिबद्ध असून नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

तरी सदरील कामगिरी ही श्री नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक, बीड, श्री राजीव नवले, प्रभारी उपविभागीय पोलीस अधीकारी, बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोनि/सोमनाथ जाधव (पो.ठा बीड ग्रामीण), झडख/ श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार आनंद मस्के, स्वाती मुंडे, अर्जुन यादव, गोविंद राख, विकास राठोड, पोलीस अंमलदार मनोज परजणे, आशपाक सय्यद, बबन सलगर, चालक नितीन वडमारे, सुनिल राठोड सर्व नेमणुक स्था.गु.शा तसेच पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथील सहा. पोलीस निरीक्षक देविदास सोनवळे, पोलीस अंमलदार मनोज जोगदंड, सतीष मुंडे, संतोष जायभाय, फेरोज पठाण, मच्छीद्र बडे, संभाजी भिल्लारे, संतोष कोठुळे, विजय जाधव, यांनी मिळून कारवाई केली आहे.

# सोयाबीनची वाढ खुंटली, एकरी ७ ते ८ क्विंटल उत्पादनाची आशा आता केवळ ५० किलोवर !

## मोरगावमध्ये केंद्रीय पथकाकडून पीक नुकसानीची पाहणी, शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर वर्षभराच्या कष्टांवर पाणी..

बीड ।प्रतिनिधी

पेरणीपासून पीक वाढविण्यापर्यंत केलेला खर्च, घेतलेले कष्ट आणि चांगल्या उत्पादनाची आशा मात्र पावसाच्या अनिश्चिततेने शेतकऱ्यांच्या या स्वप्नांवर पाणी फेरले आहे. बीड तालुक्यातील मोरगाव येथे केंद्रीय पथकाने सोयाबीन पिकाच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली, तेव्हा शेतकऱ्यांच्या संकटाची तीव्रता समोर आली.

मोरगाव येथील बाबासाहेब चोखामार यांच्या गट क्रमांक २६१ मधील शेतात दोन एकरांवर सोयाबीनची लागवड करण्यात आली होती. सर्वसाधारण परिस्थितीत एकरी ७ ते ८ क्विंटल उत्पादन अपेक्षित असते. मात्र, पावसाअभावी पिकाची वाढ खुंटली असून, आता एकरी जेमतेम ५० किलो उत्पादन मिळण्याची शक्यता असल्याची माहिती कृषी सहाय्यकांनी पथकाला दिली.





फुलोऱ्यातच पिकाला फटका !

सोयाबीन पीक फुलोऱ्याच्या अवस्थेत असताना पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने त्याचे मोठे नुकसान झाले. अपेक्षित वाढ न झाल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. पिकासाठी केलेला खर्चही निघेल की नाही, अशी चिंता शेतकऱ्यांसमोर उभी आहे.

मोरगावमध्ये नुकसानीची व्याप्ती मोठी..

गावात सुमारे १,४०० शेतकरी असून, त्यापैकी जवळपास ७० टक्के शेतकऱ्यांच्या पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. गावनिहाय नुकसानीची यादी तयार करण्याचे काम सुरू आहे. पावसाअभावी अनेक शेतकऱ्यांचे पीक अपेक्षेप्रमाणे आलेच नसल्याची व्यथाही स्थानिकांनी मांडली.

यानंतर केंद्रीय पथकाने किरण भास्कर केकाण यांच्या गट क्रमांक २५८ मधील शेताचीही पाहणी केली. त्यांच्या शेताच्या नुकसानीची नोंद घेण्यात आली.

हिरव्यागार पिकांतून सोन्यासारखे उत्पादन मिळण्याची आशा बाळगणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता उत्पन्नाचा गंभीर प्रश्न उभा आहे. मोरगावमधील प्रत्यक्ष पाहणीतून पावसाअभावी शेतीवर ओढवलेल्या संकटाची आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक विवंचनेची तीव्रता अधोरेखित झाली.

# सतिश भोसले उर्फ खोक्याभाईच्या नव्या इनिंगला सुरुवात

## संत महंतांच्या हस्ते हॉटेलचे केले थाटात उद्घाटन

मानूर (प्रतिनिधी)

कधीकाळी गुन्हेगारीचे मोठ्या प्रमाणावर आरोप झालेल्या आणि हकनाक जेल भोगलेल्या सतिश भोसले उर्फ खोक्याभाईने व्यवसायात एन्ट्री केली असून हॉटेल आणि लॉजिंगच्या माध्यमातून नव्या इनिंगला सुरुवात केली आहे.हॉटेल जय भवानी प्युअर व्हेज न्ड लॉजिंग या नव्या प्रतिष्ठानचे उद्घाटन संत महंत आणि राज्यातील प्रतिष्ठित उद्योजकांच्या तसेच मराठी सिनेतारकांच्या हस्ते शुक्रवारी दुपारी बारा वाजता संपन्न झाले.या वेळी श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थानचे उत्तराधिकारी विवेक महाराज शास्त्री,मच्छिंद्रनाथ संस्थानचे महंत जनार्दन महाराज गुरु निगमानंद महाराज,संत ज्ञानेश्वर महाराज आश्रम,दगडवाडीचे महंत नारायण महाराज ढिसले,गोरख महाराज कनुजे यांच्यासह माजी राज्यमंत्री तथा आमदार सुरेश धस,खासदार निलेश लंके,युवा नेते जयदत्त धस,रमेश गावडे,युवा उद्योजक नितीनशेठ खोड,तुषारशेठ



लड्डा,पहिलवान बजरंग कोकाटे,सरपंच किरण आहेर,कर्जतचे नगराध्यक्ष सचिन घुले, यांची उपस्थिती होती.तर कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून झी मराठी वाहिनीवरील लागीर झालं जी या प्रसिद्ध मालिकेची अभिनेत्री शिवानी बावकर उर्फ शितली,प्रसिद्ध अभिनेत्री झेबा शेख,स्नेहा पिंपरीकर,सोना इंगळे यांची उपस्थिती होती.

फॅमिलीसाठी अद्ययावत हॉटेल

शिरूर शहरात प्रथमच फॅमिलीसाठी अद्ययावत अशा प्रकारच्या हॉटेलची निर्मिती सतिश आणि सुनिल भोसले यांनी केली आहे.या वेळी उपस्थित संत महंतांनी सदरील हॉटेल कायमस्वरूपी शाकाहारीच राहू द्या कालांतराने बदल करू नका अशी सूचना केली.त्यावर भोसले परिवाराने आम्हाला हॉटेलच्या माध्यमातून फक्त समाजाची सेवा करायची असून हे हॉटेल कायमस्वरूपी शाकाहारीच राहणार असल्याचा शब्द दिला.

## नवरात्र महोत्सवा निमित्य श्री रेणुकादेवी व मुळजोगाई देवस्थान मध्ये

# अखंड हरीनाम सप्ताह निमित्य ११ऑक्टोबर २६ ऑक्टोबर दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन

अंबाजोगाई : (प्रतिनिधी)

येथील श्री रेणुकादेवी व मुळजोगाई देवस्थानचा ३७ वा वार्षिक महोत्सव रविवार, दि. ११ ऑक्टोबर ते रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आसल्याची माहिती देवस्थानचे मुख्य व्यवस्थापक व पुजारी दत्तात्रय आंबेकर व उत्सवाचे प्रमुख नानाश्री यादव यांनी दिली आहे .

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी या देवस्थानचे मुख्य पुजारी कै. शिवाजीराव आंबेकर, कै. मुकुंदाप्पा यादव, कै. श्यामलालजी मोदी, कै. बी एन. सातपुते, कै. ताराचंदजी परदेशी यांच्या प्रेरणेने व

वैकुंठवासी ह भ प माधव महाराज शास्त्री व ह भ प रामकिसन महाराज पवार यांच्या आशीर्वादाने आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात कीर्तन, भजन, हरिपाठ, अभिषेक, सप्तशतीपाठ, होम-हवन, पालखी सोहळा व आरती अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाची सुरुवात रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता योगेश परदेशी यांच्या हस्ते घटस्थापनेने व विष्णू सेठ बजाज यांच्या हस्ते गाथा पूजनाने होणार आहे. त्यानंतर दररोज सकाळी ६ ते ७ विष्णुसहस्रनाम, ७ ते ८ सप्तशतीपाठ, ८ ते ९ अभिषेक, ९ ते ११ गाथ्यावरील भजन, ११ ते १ हरिकीर्तन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ आणि ६ ते ७ आरती असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

महोत्सवात दररोज सकाळी ११ ते १ या वेळेत नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहे. यामध्ये प.पू. बालासाहेब महाराज कुलकर्णी, प.पू. विकास महाराज गडदे, प.पू. अमोल गोरे महाराज सोनेपेठकर, प.पू. पांडुरंग महाराज कोकाटे (नांदगाव), प.पू. गुरुवर्य अच्युत महाराज जोशी, प.पू. अंबादास महाराज चिक्षे, प.पू. श्रीकृष्ण महाराज चवार (आसरडोह), प.पू. आकाश पाटील महाराज (धानोरा), प.पू. प्रमोद महाराज आवाड, प.पू. गोविंद महाराज सुकरे, प.पू. शिवाजी महाराज ठोंबरे, प.पू. प्रभाकर महाराज उगले, प.पू. पांडुरंग महाराज तिडके, प.पू. विठ्ठल महाराज पुरी तसेच प.पू. गुरुवर्य किसन महाराज पवार यांच्या काल्याच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता अशोक सेठ मोदी यांच्या हस्ते होम-हवन पूजे सह पूर्णाहुती होणार असून दुपारी ४ वाजता तहसीलदार मा. विलास तरंगे यांच्या हस्ते श्रींची आरती व नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा यांच्या हस्ते मुळं जोगाईची आरती होऊन श्री ची मिरवणूक काढण्यात येणार आहे.

या उत्सवात ११ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता महाराष्ट्राचे प्रख्यात गायक सुभाष शेष यांचा कार्यक्रम व दि. १९ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता श्रीकृष्ण घोटकर यांचा भक्तिगीतांचा कार्यक्रम, संत सावता महाराज भजनी मंडळ, माळी चौक, संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ, आनंद नगर, सविता देशमुख यांचे सप्तश्रुंगी भजनी मंडळ, मध्यमवर्ती हनुमान भजनी मंडळ आणि दक्षिणमुखी भजनी मंडळ यांचा सहभाग राहणार आहे.

रविवार दि. २५ ऑक्टोबर रोजी ह भं प किसन महाराज पवार यांच्या काल्याच्या कीर्तनाने या महोत्सवाची सांगता होणार असून सोमवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत स्थानिक आराधी मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी ह भं



प अमोल महाराज घोडके, विनोद जाधव, प्रमोद पाटील, परमेश्वर दोनगहू, ओम दोनगहू, अर्जुन काटे, अंकुश शिनगारे, संतोष फुटाने, रामचंद्र बळे, गणेश आंबेकर, रजनीकांत हुलगुंडे, मंचक मोरे, रणजित लोमटे, शंकर कदम, रुद्राक्ष जाधव, बळीराम कदम, भारत कदम, अभिमन्यू मगर, राहुल मोदी, लखन मोदी, टिंकू परदेशी, मनोज सेलमोकर, पराग तांबोळी, शामल आंबेकर, प्रांजली आंबेकर ही मंडळी प्रयत्न करत आहे.




# गोमळवाडा येथे जलसेवा संकल्प अभियान संपन्न

### प्रत्येकाने आपल्या घरापासून पाणी बचत करणे ही काळाची गरज– आजीनाथ गवळी

मानूर (प्रतिनिधी)

शिरूर कासार तालुक्यातील गोमळवाडा येथे महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत बचत पाण्याची गरज काळाचीहा संकल्प घेऊन सुरू असलेल्या जलसेवा संकल्प अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन सिंदफणा जलसिंचन शाखा अभियंता विजय पाखरे यांच्या मार्गदर्शनाखाली व सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आले होते.

सध्या महाराष्ट्रात मोठा कोरडा दुष्काळ पडला असून बीड जिल्ह्यातील सर्व धरणांबरोबरच सिंदफणा धरणाने सुद्धा तळ गाठला असून प्रकल्पातील आहे तो पाणीसाठा सांभाळुन ठेवण्यासाठी प्रशासन प्रयत्नशीत असून विविध उपाययोजना देखील करत आहे.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी बोलतांना पुढील काळासाठी दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीवर चिंता व्यक्त केली.तर नागरिकांनी सुद्धा प्रत्येकाने आपल्या घरापासून पाणी बचत करणे ही काळाची गरज आहे,असे आवाहन गवळी यांनी केले.

यावेळी प्रशासनाच्या वतीने जलसिंचन शाखा अभियंता विजय पाखरे यांनी जलसंपदा विभागाच्या योजना सांगून ठिबक सिंचनाचा वापर आणि पाण्याचा काटकसरीने वापर याबद्दल मार्गदर्शन केले व पाणी अडवा,पाणी जिरवा हा मंत्र प्रत्येक शेतकऱ्याने अमलात आणावा असे सांगितले.या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी,जलसिंचन शाखा अभियंता विजय पाखरे यांचेसह के.बी.धांडे,आर. व्ही.विघ्ने,ए.एल.चिंतामणी,व्ही. एस.खेडकर,के.पी.अबदार मॅडम,दत्ता पंचघाटे यांचेसह जलसंपदा विभागाचे कर्मचारी,शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हानुमंत केदार यांनी केले तर शेवटी संदीप डोळे यांनी सर्वांचे आभार मानले.

# दुष्काळ निवारणासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा -डॉ.मनीषा कळसकर

केज/प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ संचलित सरस्वती महाविद्यालय केज येथील भूगोल विभागा च्या वतीने दुष्काळ निवारणासाठी युवकांची भूमिका या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.व्यासपीठा वर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शिका छत्रपती शिवाजी महाविद्यालय कळंब जि.धाराशिव येथील भूगोल विभागांच्या डॉ.मनीषा कळसकर, महाविद्यालयाचे भूगोल विभाग प्रमुख डॉ.नागेश कराळे व डॉ. अर्चना वाघमारे या होत्या.कार्यक्रमाच्या



सुरुवातीला प्रमुख पाहुण्याचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.प्रमुख मार्गदर्शिका डॉ.मनीषा कळसकर यांनी दुष्काळजन्य परिस्थितीत युवकांची भूमिका या विषयावर मार्गदर्शन करताना म्हटले की,दुष्काळ हा शब्द कानावर पडताच डोळ्यांसमोर उभा राहतो तो करपलेला शिवार,पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकणाऱ्या महिला आणि हवालदिल झालेला आपला शेतकरी दुष्काळ ही केवळ निसर्गाची अवकृपा नसून,ते एक मोठे सामाजिक आणि आर्थिक संकट आहे. अशा भीषण परिस्थितीत देशाची आणि समाजाची सर्वात मोठी ताकद म्हणजे आपल्या देशातील युवक वर्गानी पुढाकार घेऊन पाणी आडवा,पाणी जिरवा हा संदेश घराघरात पोहोचवणे गरजेचे आहे.पाण्याचा अपव्यय टाळणे,ठिबक व तुषार सिंचनाचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे आणि पाण्याचे महत्त्व पटवून देणे यात युवक महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.दुष्काळ म्हणजे केवळ पाऊस न पडणे नव्हे.दुष्काळ म्हणजे शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न,पिण्याच्या पाण्या साठी होणारी वणवण, रोजगारासाठी होणारे स्थलांतर आणिग्रामीण अर्थव्यवस्थेसमोर उभे राहिलेले मोठे आव्हान.

विशेषतः महाराष्ट्रातील मराठवाडा आणि इतर दुष्काळप्रवण भागांमध्ये पाण्याचा प्रश्न अनेक कुटुंबांच्या जीवनावर परिणाम करतो.शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतो आणि अनेकदा हताश होऊन टोकाचे पाऊल उचलतो.अशा वेळी युवकांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला पाहिजे, त्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवला पाहिजे.त्याचबरोबर या सगळ्या समस्यावर मात करण्यासाठी आजच्या युवक युतीनी पुढे येऊन पर्यावरणाचे संवर्धन आणि रक्षण केले पाहिजे असे सविस्तर मार्गदर्शन त्यांनी या प्रसंगी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी भूगोल विभाग प्रमुख डॉ.नागेश कराळे यांनी जल है तो,कल है व जल प्रतिज्ञा शपथ दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.ए. प्रथम वर्षातील विद्यार्थी सुमित निकम याने केले तर आभार भूगोल विभागाच्या डॉ. अर्चना वाघमारे यांनी मानले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी व आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## पुस्तकातील विज्ञान उतरले वर्गात..!

# प्रयोगांतून उमलली विद्यार्थ्यांची जिज्ञासा, 'आनंददायी शनिवार' ठरला ज्ञानाचा उत्सव..!!

उमापूर (प्रतिनिधी)

विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाविषयी जिज्ञासा निर्माण व्हावी, त्यांच्यात निरीक्षणशक्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, तसेच शिक्षण केवळ पुस्तकांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अनुभवातून मिळावे, या उद्देशाने जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, उमापूरच्या सहशिक्षिका श्रीमती शोभा दळवी मॅडम यांच्या संकल्पनेतून शाळेत 'आनंददायी शनिवार' हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोग प्रत्यक्ष करून पाहत विज्ञानाच्या अद्भुत विश्वाचा आनंद घेतला.

गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, उमापूर येथे सहशिक्षिका श्रीमती शोभा दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांनी घरातील सहज उपलब्ध होणारे साहित्य गोळा केले होते. फुगे, काचेचे ग्लास, काडेपेटी, मेणबत्ती, पाणी, तेल, निरमा, लिंबू, बॅटरी, आरसा, मीठ, बटाटे, चमचा, दोरा, खाण्याचा सोडा, लोहचुंबक, खिळे, ताट, वाटी आणि कात्री अशा दैनंदिन वापरातील वस्तूंचा प्रयोगांसाठी उपयोग करण्यात आला. या साध्या-सोप्या साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विज्ञानाची विविध तत्त्वे समजून घेण्याचा प्रयत्न केला.

प्रयोगातून शिक्षण, अनुभवातून ज्ञान..!

विज्ञानातील संकल्पना केवळ वाचून किंवा ऐकून न घेता त्या प्रत्यक्ष कृतीतून समजून घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्सुकता आणि आनंद दिसून आला. प्रत्येक प्रयोगामागील कारण शोधणे, निरीक्षण करणे, प्रश्न विचारणे आणि स्वतः



निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करणे, अशा विविध कृतींमधून विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला चालना मिळाली.

'करून पाहा आणि शिकून घ्या' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना विज्ञान हा अवघड विषय नसून आपल्या दैनंदिन जीवनाशी जोडलेला ज्ञानाचा रंजक स्रोत आहे, याची जाणीव झाली. प्रयोग करताना मिळालेला आनंद आणि त्यातून उलगडणारी वैज्ञानिक तत्त्वे यामुळे शिकण्याची प्रक्रिया अधिक आनंददायी झाली. विद्यार्थ्यांमध्ये कल्पकता, तर्कशक्ती, चिकित्सक विचार, निरीक्षणक्षमता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी 'आनंददायी शनिवार' हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. खेळता-खेळता शिकणे, स्वतः प्रयोग करणे आणि प्रश्नांच्या माध्यमातून ज्ञान मिळवणे, या शैक्षणिक दृष्टिकोनाचा सुंदर प्रत्यय या उपक्रमातून आला.

शाळेतील अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयीची आवड वाढण्यास मदत होते. अभ्यासातील संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून समजल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वासही बळकट होतो. उमापूर येथील या उपक्रमाने शिक्षण आनंददायी, कृतीशील आणि अनुभवसमृद्ध करण्याचा सकारात्मक संदेश दिला.

## मनुष्यवधाच्या गुन्ह्यातील आरोपीला उच्च न्यायालयाकडून कायमस्वरूपी अटकपूर्व जामीन

### ड. कानडे अंगद एल. (भाटसांगवीकर) यांच्या युक्तिवादाला यश माजलगावमधील विद्युत अपघात प्रकरण



माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगाव येथे विद्युत कामादरम्यान मजुराचा मृत्यू झाल्याप्रकरणी दाखल मनुष्यवधाच्या गुन्ह्यातील मुख्य आरोपी तथा शासकीय विद्युत कंत्राटदार ठोंबरे यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने कायमस्वरूपी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. आरोपीच्या वतीने विधिज्ञ ड. कानडे अंगद एल. (भाटसांगवीकर) यांनी युक्तिवाद केला.

दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी डीपी व विद्युत खांब बसविण्याचे काम सुरू असताना विद्युत धक्का लागून एका मजुराचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी माजलगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०५ अन्वये कंत्राटदार ठोंबरे व इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. माजलगाव सत्र न्यायालयाने आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर ड. कानडे यांनी उच्च न्यायालयात -इ- छे. १७५८/२०२६ हा अर्ज दाखल केला. उच्च न्यायालयाने ११ सप्टेंबर २०२६ रोजी अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. त्यानंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या अंतिम सुनावणीत आरोपीच्या वतीने केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने कायमस्वरूपी अटकपूर्व जामीन मंजूर केला.

# आष्टीत आज प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत शिफोरा (फार्मा) मेडिकलचा भव्य उद्घाटन सोहळा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी शहरातील शनी चौक परिसरात, मिलन इलेक्ट्रॉनिक्सच्या शेजारी सुरू होत असलेल्या शिफोरा (फार्मा) मेडिकलचा भव्य उद्घाटन समारंभ आज रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या उद्घाटन समारंभाला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून, या सोहळ्यामुळे आष्टी शहरातील नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

या समारंभाचे उद्घाटन आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. सुरेशरावजी धस (आण्णा) यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकमान्य शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. ड. हनुमंतराव थोरवे साहेब राहणार आहेत. या कार्यक्रमाला आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार मा. श्री. भीमरावजी धोंडे साहेब आणि माजी आमदार मा. श्री. साहेबराव दरेकर नाना हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

शिफोरा (फार्मा) मेडिकलच्या उद्घाटन सोहळ्यास आष्टीचे नगराध्यक्ष मा. जिया बेग, बीड जिल्हा परिषद सदस्य मा. सतीश शिंदे, मा. सईद चाऊस, मा. किशोर हंबर्डे, मा. संजय ढोबळे, मा. ड. सय्यद ताहेर, मा. शैलेश सहस्त्रबुद्धे, मा. नियामत बेग, मा. विजय गोल्हार, मा. रमजान तांबोळी, मा. ड. साहेबराव म्हस्के, मा. डॉ. विलास सोनवणे, मा. डॉ. शिवाजी राऊत, मा. संजय मेहेर, मा. डॉ. मधुकर हंबर्डे, मा.




डॉ. गणेश पिसाळ, मा. प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, मा. रंगनाथ धोंडे, मा. श्रीधरपंत सहस्त्रबुद्धे, मा. दत्ता काकडे, मा. ड. रिजवान शेख, मा. महेबूब जमादार, मा. मनोज धस, मा. विठ्ठल बनसोडे, मा. नामदेव राऊत, मा. अमोल तरटे, मा. सुखदेव पोकळे, मा. भारत मुरकुटे, मा. डी. बी. राऊत, मा. उत्तम बोडखे, मा. डॉ. नदीम शेख, मा. सुनील रेडेकर, मा. गणेश शिंदे, मा. शेख शरीफ, मा. आत्माराम फुंदे, मा. संतोष चव्हाण, मा. इर्शान खान, मा. मुफ्ती शफिक साहेब, मा. अज्जुभाई ताशकंद, मा. किशोर झरेकर, मा. मनोज सुरवसे, मा. पप्पू गर्जे, मा. अरुण सायकड, मा. शेठ भाई, मा. प्रविण कदम, मा. शेख युनुस (शेठ), मा. सय्यद शफी (सरपंच), मा. टाटा बेग, मा. सुरेश वारंगुळे, मा. बब्बू आतार, मा. अविनाश कदम, मा. सादिक कुरेशी, मा. बाळू घोडके आणि मा. शम्मू नगरसेवक आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

या उद्घाटन सोहळ्याला वैद्यकीय क्षेत्रातील अनेक डॉक्टरांची उपस्थिती लाभणार आहे. यामध्ये मा. डॉ. शिंदे सर, मा. डॉ. मोहोळकर सर, मा. डॉ. मोराळे सर, मा. डॉ. लाड सर, मा. डॉ. तरटे सर, मा. डॉ. पठाण सर, मा. डॉ. हांगे सर, मा. डॉ. राम सानप, मा. डॉ. काकडे, मा. डॉ. मस्के सर, मा. डॉ. अकोलकर सर, मा. डॉ. घोलप सर, मा. डॉ. साहिल सर, मा. डॉ. सानप सर, मा. डॉ. एजाज आतार सर, मा. डॉ. माने मॅडम, मा. समीर बेग, मा. डॉ. ऋषिकेश हजारे सर, मा. डॉ. पोकळे सोन्याबापू, मा. डॉ. प्रविण लोंढे, मा. डॉ. सय्यद हुमाउद्दीन सर, मा. डॉ. बोडखे सर, मा. डॉ. अजहर बेग सर, मा. डॉ. भवर सर, मा. डॉ. वारंगुळे सर, मा. डॉ. टेकाडे सर, मा. डॉ. गोसावी सर, मा. डॉ. गर्जे मॅडम, मा. डॉ. ढेरे सर आणि मा. डॉ. पल्लवी सानप मॅडम यांचा समावेश आहे. शहरातील मध्यवर्ती ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या या उद्घाटन सोहळ्याला नागरिक, हितचिंतक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून अमान तय्यब सय्यद, मुद्दसर तय्यब सय्यद आणि नवाज जाकेर शेख तसेच आदर्श मुख्याध्यापक सय्यद तय्यब सर यांनी सर्वांना उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले आहे.



## आविष्कार स्पर्धेत अट्टल महाविद्यालयाचे उल्लेखनीय यश

गेवराई (प्रतिनिधी)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्हा आविष्कार २०२६ स्पर्धा र. भ. अट्टल महाविद्यालयात नुकतीच संपन्न झाली.

या स्पर्धेत र. भ. अट्टल महाविद्यालयाच्या संघाने उल्लेखनीय यश संपादन केले. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या विभागातून महाविद्यालयास दोन पारितोषिके प्राप्त झाली. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत संदीप आडे व प्राची आर्डे या दोन विद्यार्थ्यांची केंद्रीय आविष्कार स्पर्धेसाठी निवड झाली. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष माननीय अमरसिंह पंडित यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा. रजनी शिखरे, उपप्राचार्य प्रा. विजय सांगळे, जिल्हा आविष्कार समन्वयक प्रा. मधुकर वाडीकर, प्रा. अतुल केचे, प्रा. स्वाती कुलकर्णी, प्रा. सौरभ गायकवाड उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# महाराष्ट्राचा तरुण राजस्थानात कडाडला युवकांना १६ व्या वर्षी मतदानाचा हक्क द्या

## राजवीर युधाजित पंडितांची मागणी ; मा मुख्यमंत्री वसुंधरा राजेंची उपस्थिती



गेवराई ( प्रतिनिधी ) तरुणांची राजकीय समज आणि सामाजिक प्रश्नावरील त्यांची सक्रिय सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे युवकांना १८ व्या वर्षी देण्यात आलेला मतदानाचा हक्क १६ व्या वर्षी देण्यात यावा अशी मागणी राजस्थान मधील जोधपूर येथे झालेल्या मॉडल युनायटेड नेशन्स कार्यक्रमात केली. या कार्यक्रमाचे उद्घाटन राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांच्या हस्ते करण्यात आले.

राजस्थानच्या जोधपूर येथील हॅप्पी अवर स्कूलमध्ये दिनांक १० ऑक्टोबर २०२६ रोजी मॉडल युनायटेड नेशन्सच्या तिसऱ्या सत्राचे उद्घाटन राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांच्या हस्ते झाले. यामध्ये अजमेरच्या मेयो कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी व्यावसायिक संघाची भूमिका बजावली तर हॅपी अवर्स स्कूल मधील विद्यार्थ्यांनी विरोधी संघाची भूमिका बजावली.

यावेळी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमानंतर बोलताना माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे म्हणाल्या की, राजनैतिक संबंध आणि राजकारणात केवळ बोलण्याची नव्हे तर इतरांचे ऐकणेही महत्त्वाचे आहे. जागतिक स्तरावरील आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी केवळ चर्चा करून चालणार नाही तर त्यासाठी तर्क, संवाद, सामूहिक जबाबदारी आणि स्थानिक पातळीवर कृती करणे आवश्यक आहे. तरुणांनी भविष्याबाबत केवळ चर्चा न करता ते घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले.

९ समित्यांच्या माध्यमातून निर्वासित संकट, आंतरराष्ट्रीय सुरक्षा, आरोग्य, पर्यावरण, शिक्षणातील ए आय, परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटणे, युवकांचा रोजगार, भाषिक विविधता आणि प्रसारमाध्यमांची भूमिका यासारख्या विषयावर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी लोकशाही आणि मतदानाच्या हक्कावर चर्चा करताना बीड जिल्हा परिषद चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित यांचे चिरंजीव राणा राजवीर युधाजित पंडित यांनी युवकांचे मतदानाचे वय १८ वर्षांवरून १६ वर्ष करण्याची मागणी केली. लोकशाही प्रक्रियेत तरुणांचा सहभाग, राजकीय जाणीव आणि सामाजिक प्रश्नावरील सक्रियता यावर अभ्यासू मत मांडत, मतदानाचा अधिकार हा केवळ हक्क नसून त्यासोबत जबाबदारीही येते या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांचे मत जाणून घेणे महत्त्वाचे असल्याचे म्हटले.

या कार्यक्रमाबाबत स्वतः माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून विद्यार्थी व कार्यक्रमाचे कौतुक केले आहे. कार्यक्रमास प्राचार्य माला खन्ना यांच्यासह शिक्षण आणि राजकीय क्षेत्रातले मान्यवर, विविध कॉलेजचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## सोयाबीन वाळवत होती शेतकरी महिला, केंद्रीय पथकाचा ताफा अचानक थांबला अन् जाणून घेतली व्यथा !

### दासखेडमध्ये रेखा कोकाटे यांच्याशी संवाद, गेल्या वर्षी १५ क्विंटल सोयाबीन, यंदा जेमतेम एक क्विंटल उत्पादनाची शक्यता..?





बीड ।प्रतिनिधी

शेतात सोयाबीन वाळवत असलेली एक महिला पावसाअभावी हातातोंडाशी आलेले पीक वाया गेल्याची खंत आणि त्याच वेळी दुष्काळाची पाहणी करण्यासाठी निघालेल्या केंद्रीय पथकाचा अचानक थांबलेला ताफा! बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील दासखेड येथे घडलेल्या या प्रसंगातून दुष्काळाची झळ सोसणाऱ्या शेतकरी कुटुंबाची व्यथा समोर आली.

दुष्काळी परिस्थितीची पाहणी करताना केंद्रीय पथकाने दासखेड येथे थांबून शेतात सोयाबीन वाळवत असलेल्या रेखा जयंत कोकाटे यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आपल्या शेतातील सोयाबीन पिकाची अवस्था आणि उत्पादनातील मोठी घट पथकाला सांगितली.

गेल्या वर्षी १५ क्विंटल, यंदा उत्पादनाची घसरण.!

गेल्या वर्षी ३० पोती सोयाबीन झाले होते मात्र यंदा दीड-दोन एकर क्षेत्रात जेमतेम ४० किलो सोयाबीन मिळेल,अशी व्यथा रेखा कोकाटे यांनी मांडली. चांगली काळी जमीन असूनही पावसाअभावी पिकाला पुरेसे पाणी मिळाले नाही. त्यामुळे उत्पादनात मोठी घट झाली आहे.

त्यांच्या पती जयंत बाप्पासाहेब कोकाटे यांच्या नावावर शेती आहे. यंदा जमिनीचा कस असूनही पावसाअभावी पीक अपेक्षेप्रमाणे आले नाही. हलक्या जमिनीतील पीक तर पूर्णपणे वाया गेले असून, चांगल्या जमिनीतील सोयाबीनही बाजारात विक्रीयोग्य राहिले नसल्याचे त्यांनी सांगितले.

शेताजवळून वाहणारी नदीही कोरडी पडली आहे. त्यामुळे पिकांना पाणी देण्यासाठी पर्यायी स्रोत उपलब्ध नसल्याची वस्तुस्थिती स्थानिकांनी पथकासमोर मांडली.

तलाठ्यांनी दासखेड गावातील पीक नुकसानीचे पंचनामे केले असून, उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त केली. पथकाने शेतीची प्रत्यक्ष पाहणी करून पिकांची अवस्था आणि नुकसानीची माहिती जाणून घेतली.

एका बाजूला वाळवण्यासाठी शेतात पसरलेले सोयाबीन, तर दुसरीकडे पुढील हंगामाची चिंता रेखा कोकाटे यांच्याशी झालेला हा संवाद दुष्काळामुळे शेतकरी कुटुंबांच्या आयुष्यात निर्माण झालेल्या संकटाची जाणीव करून देणारा ठरला.



## 'घाबरून जाऊ नका, सुरेश धस शिरूरकरांच्या पाठीशी!' ; दुष्काळात शेतकरी व पशुधनाला आधार देण्यासाठी आमदार धस सरसावले

मानूर (प्रतिनिधी)

शिरूर कासार तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सावरगाव (चकला) येथे सरपंच शाहादेव खेडकर यांच्या फार्महाऊसवर घाटशिळ-पारगाव जिल्हा परिषद गटातील शेतकरी, पशुपालक आणि कार्यकर्त्यांची शुक्रवार (ता. ९) बैठक पार पडली. या बैठकीत दुष्काळामुळे शेती, पाणीटंचाई, जनावरांचा चारा, शेतमजुरांचा रोजगार आणि फळबागा जगविण्याच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी या वेळी शेतकरी आणि पशुपालकांच्या अडचणी जाणून घेत, या संकटाच्या काळात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून विविध उपाययोजनांसाठी शासनदरबारी पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

शिरूरकासार तालुक्यातील गाव, वाड्या-वस्त्यांवर पशुधन वाचविण्यासाठी चारा छावण्या सुरू करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार धस यांनी सांगितले. सुमारे २०० जनावरे असलेल्या ठिकाणी तसेच शेतकऱ्यांच्या सोयीने वाड्या-वस्त्यांपासून जवळच्या अंतरावर चारा छावण्या सुरू करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार आहे. दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना पीक नुकसानभरपाई मिळावी, तसेच ऊस, कांदा आणि अन्य बागायती पिकांसाठी हेक्टरी अनुदान मिळावे, यासाठीही प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिरूर तालुक्यातील फळबागा पाण्याअभावी धोक्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांनी वर्षानुवर्षे मेहनत घेऊन उभ्या केलेल्या या बागा जगविण्यासाठी हेक्टरी दोन लाख रुपयांची मदत मिळावी, अशी मागणी केंद्र सरकारकडे करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार धस यांनी सांगितले. दुष्काळामुळे शेतमजुरांच्या हाताला काम मिळत नसल्याने रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर मजुरीची कामे सुरू करून ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठीही पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

तालुक्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी उजनी आणि जायकवाडी धरणाचे पाणी शिरूरकासार तालुक्यात आणण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही आमदार सुरेश धस यांनी सांगितले. दुष्काळाच्या संकटातून शेतकरी, पशुपालक आणि ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी त्यांच्या समस्या सोडविण्याकरिता आपण सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचा विश्वास त्यांनी उपस्थितांना दिला.

यावेळी मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते स्वर्गीय नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बैठकीला घाटशिळ-पारगाव जिल्हा परिषद गटातील सरपंच, उपसरपंच, शेतकरी, पशुपालक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

खेडकरांच्या फार्महाऊसवर स्नेहमेळावा; शेतकरी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांची मांदियाळी!

सावरगाव चकला येथील सरपंच तथा दुकानदार शाहादेव खेडकर यांच्या फार्महाऊसवर घाटशिळ-पारगाव गट व गणातील शेतकरी, लोकप्रतिनिधी, विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांसाठी स्नेहभोजनाची मेजवानी आयोजित करण्यात आली. या वेळी उपस्थितांनी एकत्रितपणे भोजनाचा आस्वाद घेतला.

# गल्हाटी धरणाच्या पाण्याला प्राधान्य द्या

## ५० हून अधिक गावांचा पाणीप्रश्न ऐरणीवर ९० हजार नागरिकांसह दोन हजार मच्छीमारांच्या उपजीविकेचा प्रश्न

घुंगर्डे हादगाव बंडू शिंगटे :- अंबड तालुक्यातील गल्हाटी मध्यम प्रकल्पाच्या पाणीवाटपाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.उपलब्ध पाण्यात गल्हाटी प्रकल्पाला प्राधान्य देऊन परिसरातील ५० हून अधिक गावे तांडे आणि वस्त्यांचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडवावा, अशी मागणी गल्हाटी धरण संघर्ष समिती शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान तसेच शेतकरी आणि ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. जवळपास ९० हजार नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा शेतीचा आणि दोन हजार मच्छीमारांच्या उपजीविकेचा प्रश्न लक्षात घेऊन प्रशासनाने ठोस निर्णय घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

गल्हाटी प्रकल्प १९६४ पासून अस्तित्वात असून या प्रकल्पावर परिसरातील हजारो शेतकरी आणि ग्रामस्थ अवलंबून आहेत. धरणाच्या पाण्यासाठी १९८८ पासून संघर्ष सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अनेक वर्षांपासून निवेदने आंदोलने आणि पाठपुरावा करूनही या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा निघालेला नसल्याने नागरिकांच्या अडचणी कायम असल्याचे संघर्ष समितीने म्हटले आहे.२५ दलघमी पाण्याची मागणी उपलब्धता केवळ १२ दलघमी

निवेदनानुसार, गुंज योजनेसाठी सात दलघमी साष्ट-पिंपळगावसाठी आठ दलघमी आणि गल्हाटी प्रकल्पासाठी दहा दलघमी अशी एकूण २५ दलघमी पाण्याची मागणी आहे.मात्र उपलब्ध पाण्याची मर्यादा १२ दलघमी असल्याने १३ दलघमीची तूट निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर पाण्याचे नियोजन करताना लोकसंख्या पिण्याच्या पाण्याची गरज शेती दुष्काळी परिस्थिती आणि नागरिकांची उपजीविका या बाबींचा वस्तुनिष्ठ विचार करून गल्हाटी प्रकल्पाला योग्य प्राधान्य द्यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

१९९५-९६ मधील पत्राची पडताळणी करा

तत्कालीन जिल्हाधिकारी श्रीमती कविता गुप्ता यांच्या १९९५-९६ मधील पत्राची शासकीय अभिलेखांतून अधिकृत पडताळणी करण्यात यावी अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.जालना शहरासाठी गल्हाटी प्रकल्पातून पाणी नेण्याच्या वेळी धरणातील पाणी अपुरे पडल्यास गोदावरी नदीतून पाणी आणण्याबाबत आश्वासन देण्यात आले होते



असा दावा संघर्ष समितीने केला आहे. या दाव्याची अभिलेखांच्या आधारे पडताळणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

गोदावरीतून पाणी आणण्याचे पर्याय तपासा

गल्हाटी धरणात अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देण्यासाठी तीन पर्यायांचा तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता अभ्यास करण्याची मागणी करण्यात आली आहे. पाथरवाला बुद्रुक येथून गोदावरी नदीवर आधारित उपसा सिंचन योजना राबविणे वडीगोद्री किंवा नालेवाडी येथून कालव्याद्वारे पाणी आणणे आणि डाव्या कालव्यातून पाइपलाइनद्वारे पाणी उपलब्ध करून देणे या पर्यायांची व्यवहार्यता तपासावी असे निवेदनात म्हटले आहे.

याशिवाय पाणलोट क्षेत्रातील बंधाऱ्यांमुळे धरणात येणाऱ्या पाण्यावर काय परिणाम होतो याची माहिती घेण्यासाठी स्वतंत्र जलवैज्ञानिक सर्वेक्षण करण्यात यावे अशी मागणीही करण्यात आली आहे.

दोन हजार मच्छीमारांच्या रोजगाराचा प्रश्न

जलाशयातील पाण्याच्या कमतरतेचा परिणाम मत्स्यव्यवसायावर होत असून जवळपास दोन हजार मच्छीमारांच्या उपजीविकेचा प्रश्न गंभीर बनल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. बाधित मच्छीमारांचे अधिकृत सर्वेक्षण करून त्यांना शासनाच्या लागू असलेल्या योजनांमधून मदत उपलब्ध करून द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

केवळ आश्वासन नको कालबद्ध निर्णय हवा

गल्हाटी प्रकल्पाच्या पाणीप्रश्नावर आता ठोस प्रशासकीय निर्णय होण्याची गरज असल्याचे संघर्ष समितीने अधोरेखित केले आहे. प्रकल्पाला प्राधान्य देण्याबाबत लेखी निर्णय घ्यावा जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय बैठक आयोजित करावी आणि कायमस्वरूपी पाणी उपलब्धतेसाठी निश्चित कालमर्यादेसह कृती आराखडा जाहीर करावा अशी मागणी करण्यात आली आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर प्रशासन कोणती भूमिका घेते याकडे परिसरातील ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

या निवेदनावर गल्हाटी संघर्ष समितीचे अध्यक्ष राधाकिशन मैंद, उपाध्यक्ष पांडुरंग गटकळ, शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. आर. व्ही. छल्लारे, राजू सोळुंके, पत्रकार विष्णू नाझरकर, तान्हाजी धुमाळ, राजेंद्र साळुंखे, अहिल्याजी ढोणे, गोपाळ रोटे, गंगाराम पवळ, पांडुरंग ढोणे, पवन मुंढे, संभाजी सव्वासे, सुरेश पवार, आदेश वाघ, पोपट खंडागळे यांच्यासह अनेक शेतकरी व ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

---

## जि.प.माध्यमिक शाळा मुलांची आष्टी येथील शोयाब पठाण जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत प्रथम

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मुलांची, आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथील गुणवंत विद्यार्थी शोयाब शहाबाज पठाण याने जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आपल्या अचूक नेमबाजीच्या जोरावर त्याने हे यश मिळवत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्याच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील नावलौकिकात भर पडली असून, सर्व स्तरांतून त्याचे अभिनंदन केले जात आहे. रायफल शूटिंगसारख्या कौशल्य, एकाग्रता, संयम आणि अचूकतेची कसोटी पाहणाऱ्या क्रीडाप्रकारात शोयाबने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून आपल्या गुणवत्तेची चमक दाखवून दिली आहे. या यशाच्या जोरावर त्याची विभागीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यामुळे आता विभागीय स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करून यशाची परंपरा कायम राखण्याची संधी त्याला मिळाली आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेला प्रोत्साहन देणे आवश्यक असते. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव, जिद्द आणि आत्मविश्वास यांच्या बळावर विद्यार्थी विविध क्षेत्रांत यश संपादन करू शकतात, हे शोयाबच्या यशातून अधोरेखित झाले आहे. त्याने मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे. शोयाब शहाबाज पठाण



याने मिळवलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मुलांची, आष्टी यांच्या वतीने त्याचे अभिनंदन करण्यात आले. गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी, शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश सातपुते, केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे तसेच शाळेतील सर्व शिक्षकांनी शोयाबचे कौतुक करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विभागीय पातळीवरील आगामी स्पर्धेतही शोयाबने उत्कृष्ट कामगिरी करावी, आपल्या कौशल्याच्या जोरावर यशाची नवी शिखरे गाठावीत आणि शाळेसह आष्टी तालुक्याचे नाव उज्ज्वल करावे, अशा सदिच्छा यावेळी व्यक्त करण्यात आल्या. शोयाबच्या या यशामुळे शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

## आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून दोन चिमुकल्यांना उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून १ लाख ४० हजारांची मदत!

### प्रणिता वाघुलेला मुख्यमंत्री सहायता निधीतून ९० हजार, तर अभंग पारवेच्या डोळ्याच्या शस्त्रक्रियेसाठी योजनेतून ५० हजारांची मंजुरी

पाटोदा - ।प्रतिनिधी

आजारपणाचे संकट, उपचारांचा वाढता खर्च आणि आर्थिक विवंचनेत सापडलेल्या गरजू रुग्णांना शासकीय योजनांच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात विविध स्तरांवर प्रयत्न केले जात आहेत. राज्यात दररोज हजारो रुग्णांना उपचारांसाठी आर्थिक मदत मिळत असताना, आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघातील गरजू रुग्णांनाही मदत मिळावी यासाठी लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. याच प्रयत्नांतून पाटोदा तालुक्यातील दोन रुग्णांच्या उपचारांसाठी एकूण १ लाख ४० हजार रुपयांची मदत मिळवून देण्यात आली आहे.

नायगाव येथील प्रणिता रमेश वाघुले हिच्या मेंदूच्या गंभीर आजारावरील उपचारांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून ९० हजार रुपये मिळवून देण्यात आले, तर वैद्यकीनी येथील ११ वर्षीय अभंग अर्जुन पारवे याच्या डोळ्याच्या पडद्यावरील शस्त्रक्रियेसाठी योजनेतून ५० हजार रुपयांची मंजुरी मिळाली. या मदतीमुळे दोन्ही कुटुंबांना उपचारांच्या खर्चाबाबत मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.

नायगाव, ता. पाटोदा येथील रमेश वाघुले यांची मुलगी प्रणिता वाघुले हिला जीबीएस (गिलियन-बॅरे सिंड्रोम) या गंभीर आजारावरील उपचारांसाठी सोलापूर येथील अश्विनी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मागील महिनाभरापासून उपचार सुरू असल्याने कुटुंबावर मोठा आर्थिक भार पडला होता. या परिस्थितीत अशोक सुपेकर यांना प्रकरणाची माहिती देण्यात आली. त्यांनी ही बाब लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या निदर्शनास आणून दिली त्यानंतर आमदार सुरेश आण्णा धस यांनी आपले आरोग्य विभागाचे टीम यांना तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या त्यानंतर मुख्यमंत्री सहायता निधीतून सुरुवातीला ५० हजार रुपयांची मदत मिळवून देण्यात आली. पुढे विशेष बाब म्हणून आणखी ४० हजार रुपयांची मदत मिळाली. अशा प्रकारे एकूण ९० हजार रुपयांची आर्थिक मदत उपलब्ध झाल्याने वाघुले कुटुंबाला मोठा आधार मिळाला. या कामात संकटाच्या काळात मिळालेल्या या मदतीबद्दल



प्रणिताचे वडील रमेश वाघुले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार सुरेश आण्णा धस आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे आभार व्यक्त केले.

अभंग पारवेच्या डोळ्याच्या पडद्याची शस्त्रक्रिया यशस्वी

वैद्यकीनी येथील ११ वर्षीय अभंग अर्जुन पारवे याच्या डोळ्याच्या पडद्यावरील शस्त्रक्रियेचा प्रश्नही आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून मार्गी लागला. पुणे येथील देसाई आय के हॉस्पिटलमध्ये अभंगवर शस्त्रक्रिया करण्यात आली असून ती यशस्वी झाली. या उपचारांसाठी योजनेतून ५० हजार रुपयांची मंजुरी मिळवून देण्यात आली. त्यामुळे कुटुंबावरील आर्थिक भार कमी होण्यास मदत झाली राहुल बप्पा शिंदे यांनी देखील या कुटुंबाला आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून सहकार्य केले त्याचप्रमाणे योजनेतून मोफत उपचार मिळवून देण्यासाठी आरोग्य स्वीय सहाय्यक यांनी पाठपुरावा केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात रुग्णांना आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रयत्नांच्या अनुषंगाने, आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघातील गरजू रुग्णांनाही वेळेत मदत मिळावी यासाठी आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे.आरोग्य विभागाचे स्वीय सहाय्यक ड. महेश बेद्रे, पाटोदा येथील स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे आणि संबंधित आरोग्य टीम रुग्णांच्या प्रकरणांचा पाठपुरावा करून त्यांना उपलब्ध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहे.मुख्यमंत्री सहायता निधी असो किंवा उपचारांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजना, पात्र रुग्णांना मदत मिळावी, कागदपत्रांची पूर्तता व्हावी आणि आर्थिक अडचणींमुळे उपचारांत अडथळे येऊ नयेत, यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधला जात आहे.प्रणिता वाघुलेच्या उपचारांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून मिळालेली ९० हजार रुपयांची मदत आणि अभंग पारवेच्या शस्त्रक्रियेसाठी मंजूर झालेले ५० हजार रुपये, अशा एकूण १ लाख ४० हजार रुपयांच्या मदतीमुळे दोन कुटुंबांना मोठा आधार मिळाला आहे. शासकीय योजनांचा लाभ गरजू रुग्णांपर्यंत पोहोचविण्यासाठी लोकप्रतिनिधींचा पाठपुरावा आणि आरोग्य टीमचा समन्वय महत्त्वाचा ठरत असल्याचे या दोन्ही प्रकरणांतून दिसून येते.

---

## दरोड्याच्या गुन्ह्यातील दीड वर्षापासून फरार अट्टल गुन्हेगारास नेकनूर पोलिसांकडून अटक

### पोलीस कोठडीत आत्महत्येचा प्रयत्न, परंतु पोलीस अंमलदारांच्या सतर्कतेमुळे वाचला जीव

बीड ।प्रतिनिधी

नेकनूर पोलीस ठाणे गु.र.नं. ११७/२०२५, भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३१०(२) अन्वये दाखल असलेल्या दरोड्याच्या गंभीर गुन्ह्यात मागील दीड वर्षापासून पोलिसांना गुंगारा देणारा फरार अट्टल आरोपी बालाजी ऊर्फ आबड्या अजिनाथ शिंदे (वय २२ वर्षे, रा. मांडवा, ता. वाशी, जि. धाराशिव) यास नेकनूर पोलिसांनी दिनांक ९ ऑक्टोबर २०२६ रोजी वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून शिताफीने ताब्यात घेऊन रात्री १०:४७ वाजता अटक केली होती. सदर आरोपी हा अटक व कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी स्वतःला इजा करून घेण्याच्या सवयीचा असल्याने त्यास पकडणे पोलीस प्रशासनासमोर मोठे आव्हान होते. मात्र, बीड पोलिसांनी योग्य नियोजन व विशेष खबरदारी घेऊन आरोपीस अटक करण्यात यश मिळविले. अटकेनंतर आरोपीची वैद्यकीय तपासणी करून त्यास नेकनूर पोलीस ठाण्याच्या लॉकअपमध्ये ठेवण्यात आले होते.




दिनांक १० ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे सुमारे २:१५ वाजण्याच्या सुमारास आरोपीने लॉकअपमधील पांघरुणाच्या कापडाचा वापर करून गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र, लॉकअप सुरक्षेसाठी तैनात असलेल्या पोलीस अंमलदारांच्या ही बाब तत्काळ निदर्शनास आल्याने त्यांनी क्षणाचाही विलंब न करता तत्परतेने हस्तक्षेप करून आरोपीचा जीव वाचविला. त्यानंतर आरोपीस तातडीने शासकीय रुग्णालय, नेकनूर व प्रथमोपचारानंतर पुढील उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालय, बीड येथे हलविण्यात आले. वैद्यकीय तपासणीअंती आरोपीची प्रकृती स्थिर असल्याचे निष्पन्न झाले. उपचारानंतर रुग्णालयातून डिस्चार्ज मिळताच आरोपीस न्यायालयात हजर करून १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी मागण्यात आली. न्यायालयाने आरोपीस १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी मंजूर केल्याने त्याची बीड जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. तसेच पोलीस कोठडीत असताना कायदेशीर कारवाई टाळण्याच्या उद्देशाने आत्महत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध नेकनूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ७२८/२०२६, इछड कलम २२६ अन्वये स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

या संपूर्ण प्रसंगात पोलीस अधिकारी व अंमलदारांनी दाखविलेली सतर्कता व तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला. बीड पोलिसांनी समयसूचकता दाखवत आरोपीचे प्राण वाचवून त्याच्या जीविताचे रक्षण केले.

---





## बीड शहरालगतच्या बिंदुसरा तलावाची केंद्रीय पथकाकडून पाहणी

### धरणातील उपयुक्त पाणीसाठा ५ टक्क्यांवर, पाणीपुरवठ्याच्या नियोजनाचा घेतला आढावा

बीड ।प्रतिनिधी

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने बीड शहरालगतच्या पाली येथील बिंदुसरा तलावाची पाहणी करून धरणातील पाणीसाठा आणि शहरासह परिसरातील पाणीपुरवठ्याच्या स्थितीचा आढावा घेतला.

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव तथा पथकप्रमुख मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील पथकाला अधीक्षक अभियंता, पाटबंधारे पल्लवी जगताप यांनी धरणातील पाणीसाठा, पिण्याच्या पाण्यासाठीचे आरक्षण आणि उपलब्ध जलस्रोतांबाबत माहिती दिली.

यंदा पाणीसाठ्यात मोठी घट..

बिंदुसरा तलावात ३० जून २०२६ रोजी १७ टक्के उपयुक्त पाणीसाठा होता. सध्याच्या स्थितीत तो केवळ ५ टक्क्यांवर आला आहे. मागील वर्षी याच धरणात १०० टक्के पाणीसाठा होता, अशी माहिती पथकाला देण्यात आली.धरणाचा एकूण साठा ०.२८ पीएमसी, तर उपयुक्त पाणीसाठा ०.२५ पीएमसी असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

पाणीसाठ्यातील घट लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचे नियोजन आणि उपलब्ध जलस्रोतांच्या वापराबाबत पथकाने सविस्तर चर्चा केली.

माजलगाव धरणाच्या पाण्यावर शहराची भिस्त..

बीड शहराला दररोज सुमारे ३८ एमएलडी पाण्याची गरज आहे. त्यापैकी २८ एमएलडी पाणी माजलगाव धरणातून, तर उर्वरित पाणी बिंदुसरा तलावातून उपलब्ध होत असल्याची माहिती देण्यात आली. बिंदुसरा तलावातील पाणीसाठा कमी होत असल्याने आगामी काळात शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी पर्यायी स्रोतांचा वापर आणि पाणी उपलब्धतेचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे.

यंदा सिंचनासाठी पाणी न देता उपलब्ध पाणीसाठा पिण्याच्या पाण्यासाठी वापरण्याचे नियोजन असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर धरणातील उपलब्ध पाणीसाठा, शहराची पिण्याच्या पाण्याची गरज आणि आगामी काळातील पाणीपुरवठ्याचे नियोजन यांची माहिती घेऊन केंद्रीय पथकाने परिस्थितीचा आढावा घेतला.